
परमपिता परमात्मा त्रिमुर्ती शिवभगवानुवाच 'मन्मनाभव।'

# अमृत कुंभ

## अंतरंग

वर्ष १२, अंक ३. ऑगस्ट-सप्टेंबर २०१८




१) वरदानीमुर्त दादी प्रकाशमणीजी (संपादकीय) २
२) भारताला स्वर्ग बनविणारे अलौकिक रक्षाबंधन ५
३) अमृतवेळेच्या योगाचे महत्त्व ७
४) आपलं विश्वच वेगळं ८
५) सेल्फी १०
६) मोह या विकारावर विजय १२
७) श्रीकृष्ण भारतात पुन्हा लवकरच येणार आहे १३
८) ईश्वरीय कार्य व्यवहारात आदर्श व्यवस्था... १४
९) सचित्र सेवावृत्त १६
१०) गणपती बाप्पा मोरया १८
११) मर्यादायुक्त जीवन हाच पुरुषोत्तम बनण्याचा आधार २१
१२) समस्त धर्मियांना मान्य होईल असा..... २३
१३) आरोग्यम् धनसंपदा २७
१४) माझे जीवन धन्य झाले (अनुभव) ३१


## मुखपृष्ठाविषयी

जसे गुलाब पुष्पाला 'किंग ऑफ फ्लॉवर्स' (फुलांचा राजा) असे संबोधण्यात येते तशा दादी प्रकाशमणीजी या देखील ब्राह्मण परिवारासाठी 'रुहानी (आत्मिक) गुलाब होत्या. दादीजींचा हसरा चेहरा अलौकिक आत्मिक प्रेमाचा जणू आरसा होता. त्यांच्या चमकणाऱ्या दिव्य नेत्रातून स्नेहयुक्त दृष्टीची वर्षा होत असे. दादीजींचे वरदानी हस्त, विश्वातील सर्व आत्म्यांना बेहद स्नेह पाशात सामावून घेणारे होते. त्यांच्या चेहऱ्यावरचे निर्मल हास्य बघून कुठलीही व्यक्ती भारावून जात असे. त्यामुळे दादीजींना एकदा भेटलेली व्यक्ती, पुन्हा भेटण्यासाठी आतूर असे. प्रत्येकाला दादीजीमध्ये जगत् मातेची झलक दिसत असे.

दादीजी आनंद, प्रेम, पवित्रता, वात्सल्य, सद्भावना या सर्व गुणांच्या जणू सरिता होत्या. त्यांचे चुंबकीय व्यक्तिमत्व सर्वांना आकर्षित करीत असे. अशा सर्वगुण मूर्त, वरदानीमूर्त दादीजींना त्यांच्या ११व्या दिव्य स्मृतीदिनानिमित्त (दि. २५ ऑगस्ट रोजी) आम्हा सर्वांचे कोटी-कोटी प्रणाम!

**-प्रकाशक अमृतकुंभ**


**फोटो, लेख, आदी पाठविण्याचा पत्ता :**
संपादक - अमृतकुंभ, द्वारा : प्रजापिता ब्रह्माकुमारीज्
ए-१०, वर्षा अपार्टमेंट, छत्रपती शिवाजी सोसायटी,
कोपरी कॉलनी, ठाणे (पू.)-४००६०३
फोन : ०२२-२५३२२२०८.
E-mail : info@amrutkumbh.com.


**वर्गणी पाठविण्याचा पत्ता :**
बी.के. गोदावरी, प्रकाशक अमृतकुंभ द्वारा :
प्रजापिता ब्रह्माकुमारीज्, ए-१०, वर्षा अपार्टमेंट,
छत्रपती शिवाजी सोसायटी, कोपरी कॉलनी, ठाणे
(पूर्व) - ४००६०३ मोबाईल : ९८२००२३०९२



प्रजापिता ब्रह्मा कुमारी ईश्वरीय विश्व विद्यालयाचे मुखपत्र 'अमृतकुंभ' द्वैमासिक मुद्रक व प्रकाशक बी.के. गोदावरी यांनी परफेक्ट प्रिंट, २२ ज्योती इंडस्ट्रियल इस्टेट, नुरीबाबा दर्गा रोड, ठाणे (पश्चिम) - ४००६०१ येथे छापून प्रजापिता ब्रह्माकुमारीज्, लाईट हाऊस, वागळे इस्टेट, ठाणे (पश्चिम) - ४००६०४ येथे प्रसिद्ध केले. संपादक ब्र. कु. शिवाजी चौधरी, संगणक अक्षरजुळवणी : आदिती ग्राफिक्स, उद्यमवाडी, विष्णुनगर, संभाजी पथ, ठाणे-२. मो. : ९८२१५१५०८३

**वार्षिक वर्गणी रु. ६५/-, आजीव सभासद वर्गणी रु. १,३००/-**

E-magazine **साठी पुढील संकेतस्थळाला (वेबसाईटला) भेट द्या –** www.amrutkumbh.com.



(संपादकीय)

# वरदानीमूर्त दादी प्रकाशमणीजी

दादी प्रकाशमणीजी अशा एक विभूती होत्या की ज्यांचे जीवन एखाद्या परीसाप्रमाणे होते. जसा परीसाचा स्पर्श होताच लोखंडाचे सोने होते तसाच दादीजींचा सहवास लाभल्याने हजारो, लाखो ब्रह्मवत्सांच्या जीवनाचे सोने झाले. त्यांना बघताच अपार आध्यात्मिक उर्जेचा अनुभव होत असे. त्यांची स्नेहयुक्त दृष्टी पडताच समोरच्या व्यक्तीमध्ये जणू उमंग-उत्साहाच्या लाटा उफाळून येत असत. त्यांचे मधुर बोल ऐकताच, मन आनंदाने भरून जात असे. जेव्हा त्या आपल्या हाताने टोली (प्रसाद) देत असत, तेव्हा त्यांच्या हाताचा स्पर्श होताच दिव्य शक्तीचा संचार होत असे. कारण दादीजी परमपवित्र आत्मा होत्या. त्यांच्या संकल्पामध्ये सुद्धा कुणाविषयी नकारात्मक भाव नव्हता. दादीजींच्या समोर कोणीही आले तरी दादीजी त्याला निस्वार्थ प्रेम, अलौकिक खुशी व शक्तीने संपन्न करीत असत. **दादीजींचे बोलणे, चालणे, पहाणे, दृष्टी देणे, स्नेहयुक्त वार्तालाप करणे, मुरली वाचन करणे... या सर्वच गोष्टी अलौकिक व दिव्यता संपन्न होत्या. फलस्वरूप त्यांचे प्रत्येक कर्म ब्रह्मावत्सांना अलौकिक पुरुषार्थाची प्रेरणा देत असे. दादीजींचे बोल वरदानांच्या रूपाने प्रॅक्टीकलमध्ये सिद्ध झाल्याचे अनेकांनी अनुभवले आहे. आजही त्यांची दिव्य व सूक्ष्म उपस्थिती आपणा सर्वांना स्नेह, शक्ती व वरदान प्रदान करीत आहे. अशा वरदानीमूर्त दादी प्रकाशमणीजींचा जीवनपट आपण थोडक्यात पाहूया.**

**दादीजींचा जीवन परिचय –**

दादीजींचा जन्म सन १९२२ मध्ये एका धार्मिक कुटुंबात, हैदराबाद (सिंध) मध्ये झाला. वयाच्या ७-८ वर्षापासून त्या श्रीकृष्णाची भक्ती करीत. लहानपणी त्यांची इच्छा होती की, 'मला मीरासारखे बनायचे आहे.' लहानपणीच त्यांनी गीता, रामायण, भागवत, सुखमणि, जप साहेब हे ग्रंथ वाचले होते. पुढे वयाच्या १४ वर्षी (सन १९३६ मध्ये) त्यांनी प्रजापिता ब्रह्मा बाबांच्या शरीरात अवतरित, परमात्मा शिव पित्याला ओळखले. लगेचच त्यांनी आपले जीवन ईश्वरीय कार्यासाठी समर्पित केले. त्यानंतर सुमारे ७१ वर्षाच्या अलौकिक जीवनाच्या कालखंडात (सन १९३६ ते २००७) त्यांनी विश्वसेवेचे महान कार्य केले. दादीजींनी एखाद्या प्रकाशस्तंभाप्रमाणे दाही दिशांना ईश्वरीय ज्ञानप्रकाश पोहोचविण्याचे दिव्य कर्म केले. फलस्वरूप १३० देशातून संस्थेची सेवाकेंद्रे उघडण्यात आली. दादीजींनी सर्व ब्रह्मावत्सांना मातृवत पालना दिली. दादीजींची हर्षितमुखता अवर्णनीय होती. त्या सदैव प्रसन्नचित्त असत. **दादीजी बालब्रह्मचारिणी, महान तपस्वी व पवित्रतेची साक्षात मूर्ती होत्या. फलस्वरूप त्यांच्यात सर्व गुण, सर्व शक्ती तसेच सर्व सिद्धी अनुभवाला येत असत.** दादीजी स्नेहस्वरूपा होत्या. त्यामुळे त्यांच्या अलौकिक, निस्वार्थ व आत्मिक स्नेहाने सर्वांची मने सहजच जिंकली जात असत.

**दादीजींचे मुरलीवर अपार प्रेम होते –**

दादीजी शिवबाबांच्या मुरलीच्या मस्तानी गोपिका होत्या. अव्यक्त बापदादांचे अवतरण झालेले असतांना, सुरुवातीपासून शेवटपर्यंत त्या समोर खाली बसून मुरली ऐकण्याचा आनंद घेत असत. आपल्या हाताने डायरीमध्ये संपूर्ण मुरली लिहित असत. **रोजची मुरली त्या किमान ३ वेळा वाचत असत. पहिल्यांदा म्हणजे क्लासमध्ये मुरली वाचण्यापूर्वी, दुसऱ्यांदा**

**संध्याकाळी चहापानानंतर आणि तिसऱ्यांदा रात्री झोपण्यापूर्वी. रात्री झोपायला कितीही उशीर झाला तरी मुरली वाचल्याशिवाय त्या झोपत नसत. शिवबाबांच्या मुरलीवर त्यांचे अपार प्रेम होते.**

मुरलीचे वाचन करतांना दादीजींच्या श्रीमुखातून जो मुरलीचा मधुर मधुरस टपके, त्याची तुलना कुणाशीही होऊ शकत नाही. मुरलीच्या रंगात स्वतः रंगून दुसऱ्यांना त्या अमृतमय रसाचा स्वाद चाखविण्यात, दादीजींसारखे दुसरे कोणी होणे शक्य नाही. क्लासमध्ये मुरली ऐकवतांना दादीजी त्यात आपली कुठलीही गोष्ट मिसळत नसत. शिवबाबांनी जे सांगितले, जसे सांगितले, तसेच्या तसे त्या सांगत असत. त्यामुळे मुरलीतील महावाक्यं सर्वांच्या अंतरंगात जणू कोरली जात असत.

शेवटी प्रकृती अस्वास्थ्यामुळे दादीजींना हॉस्पिटलमध्ये दाखल करण्यात आले होते. त्यावेळी वरिष्ठ दादी-दीदी त्यांना विचारत असत की दादीजी, तुम्ही समाचार ऐकणार का? तेव्हा त्या स्पष्टपणे नकार देत असत. परंतु नंतर मुरली ऐकणार का? असे विचारताच त्या होकर देत असत. तसेच मुरली ऐकतांना त्या अत्यंत लक्षपूर्वक, जागृत अवस्थेत मुरलीचे श्रवण करीत असत. मुरली ऐकतांना दादीजींना कधीही झोप आली नाही. तात्पर्य म्हणजे शेवटच्या क्षणापर्यंत दादीजींना मुरलीविषयी अपार प्रेम होते. असेच प्रेम प्रत्येक ब्रह्मावत्साला असले पाहिजे.

**सदैव बाबांच्या सन्मुखतेचा अनुभव –**

सन १९६५ मध्ये दादीजींच्या समवेत ब्र. कु. रानी बहेन यांना मुंबईच्या सेवाकेंद्रावर रहाण्याची संधी मिळाली होती. त्यावेळी त्यांना आलेला अनुभव पुढीलप्रमाणे आहे. एके दिवशी दादीजींच डोक दुखत होत. रानी बहेन त्यांच्या डोक्याला बाम लावत होती. त्यावेळी खोलीत आणखी दुसरं कोणी नव्हतं. **अचानक दादीजी म्हणाल्या, रानी बघ, बाबा माझ्यासमोर उभे आहेत. थोड्या वेळाने दादीजी म्हणाल्या, संपूर्ण दिवसभरात अशी कोणती वेळ नसेल जेव्हा बाबा माझ्यासमोर नसतात. त्यावेळी रानी बहेनने विचारले कोणते बाबा? त्यावर दादीजी म्हणाल्या, दोन्ही कम्बाइंड (एकत्रित) आहेत ना?**

अशाप्रकारे बाबांच्या (शिवबाबा व ब्रह्माबाबांच्या) सन्मुखतेचा अनुभव दादीजींना सदैव होत असे.

**दादीजींची स्थिती बापसमान कशी बनली –**

**दादीजी, बाबांच्या अनन्य रत्न होत्या. परंतु पुरुषार्थ करता-करता त्या बापसमान बनल्या.** शिवबाबा जसे ज्ञानाचे सागर आहेत तशी दादीजींमध्ये सुद्धा ज्ञानाची पराकाष्ठा होती. त्या मास्टर ज्ञानसागर होत्या. परमात्म्याला जसे 'सत्यम् शिवम्' म्हटले जाते. तसे दादीजी आपल्या संपूर्ण जीवनात सदैव सत्यच बोलल्या. त्या कधीही खोटं बोलल्या नाहीत. सत्यतेचा आधार पवित्रतेची शक्ती असते. दादीजींमध्ये पवित्रतेची शक्ती होती. त्या बालब्रह्मचारिणी होत्या. त्यांचा चेहरा चमकत होता व त्यातून पवित्रतेची किरणे पसरत होती. शिवबाबा जसे शांतीचे सागर आहेत तशा दादीजी देखील मास्टर शांतीच्या सागर होत्या. त्या ब्रह्माकुमारीज् संस्थेच्या मुख्य प्रशासिका असूनही, कधी अशांत झाल्या नाहीत. सदैव हर्षितमुख व प्रसन्न चित्त होत्या. शिवबाबा जसे प्रेमाचे सागर आहेत, दादीजी देखील प्रेमाची देवी होत्या. शिवबाबा जसा सुखाचा सागर आहे तशाच दादीजी सर्वांसाठी सुखदायिनी होत्या. त्यांनी संकल्पमात्र वा स्वप्नमात्र सुद्धा दुसऱ्यांना दुःख दिले नाही. तसेच कोणाकडून दुःख घेतलेही नाही. शिवबाबा आनंदाचा सागर आहे. तशा दादीजी सदैव आत्मिक आनंदात मग्न असत. त्यांच्या चेहऱ्यावरचा आनंद ओसंडून वहात असे. **शिवबाबा जसा सर्व शक्तींचा सागर आहे तशा दादीजी सर्व शक्तींची देवी होत्या. त्यांच्या प्रत्येक कर्मात आध्यात्मिक शक्ती प्रत्यक्ष होत असे. त्यामुळेच असंभव वाटणाऱ्या अनेक गोष्टी त्यांनी अगदी सहज संभव करून दाखवल्या. अशा रीतीने सर्व गुणांची धारणा करून, दादीजी बापसमान बनल्या.**

**दादीजींचे वरदानी बोल –**

एकदा दादीजी कटक येथे

सेवाकेंद्राच्या पायाभरणी कार्यक्रमासाठी गेल्या होत्या. त्यावेळी तेथे असलेल्या ब्र. कु. राज बहेन, दादीजींना म्हणाल्या की सेवाकेंद्राची इमारत बांधून झाल्यावर, तिच्या उद्घाटनासाठी आपल्यालाच यायच आहे, हे लक्षात ठेवा. त्यावर दादीजी म्हणाल्या की याविषयी मी आता काही सांगू शकत नाही. शक्य झाल्यास मी येईन. दुसऱ्या दिवशी अमृतवेळेचा योग झाल्यानंतर राज बहेन, दीदीजींना म्हणाल्या की, सेवाकेंद्राची इमारत कशी बांधायची, याचा प्लॅन फक्त कागदावर तयार आहे. परंतु अजून हातात पैसा आलेला नाही. त्यावर दादीजी म्हणाल्या, ''तू येथे २० वर्षापासून सेवा करत आहेस. त्यामुळे सर्व गोष्टी अगदी सहज पार पाडतील.'' दादीजींचे हे बोल, वरदान रूपाने प्रॅक्टीकलमध्ये सिद्ध झाले व ठरविल्याप्रमाणे दोन वर्षाच्या कालावधीत सेंटरची इमारत बांधून तयार झाली.

**अशाप्रकारचे अनेक ब्रह्माकुमारी भगिनींचे अनुभव आहेत. फलस्वरूप दादीजींच्या प्रशासन काळात, भारतात व विदेशात हजारोंच्या संख्येने संस्थेची सेवाकेंद्रे उघडण्यात आली.**

दादीजी सदैव बापसमान व समीप रहाणाऱ्या असल्याने, वरदानीमूर्त होत्या. जे आत्मे बापसमान आहेत ते सदा संपन्न असल्याने, दुसऱ्यांना वरदान देऊ शकतात. त्यामुळे आता समयानुसार आपणा सर्वांना देखील सर्व प्राप्ती संपन्न बनून, वरदानी बनण्याची आवश्यकता आहे. जे भविष्यात इष्ट देवीदेवता बनणार आहेत, त्यांची निशाणी आहे सदा वरदानी स्थिती. त्यामुळे आपणही दादीजींचे अनुकरण करू या तसेच वरदानी स्थिती प्राप्त करण्यासाठी, तीव्र पुरुषार्थ करू या.

**मुख्य म्हणजे दादीजी स्वतःला जगत् माता अनुभव करीत व सर्वांची आध्यात्मिक उन्नती करण्यासाठी प्रयत्नशील असत. त्यांचे निर्मल, निस्वार्थ प्रेम व शुभ-भावनांचे प्रकंपन सर्वांना आकर्षित करीत असत.**

**दादीजी सदा नम्र व निरहंकारी होत्या –**


दादीजींच्या मुखातून 'मी करते' हा शब्द कोणी कधीही ऐकला नाही. त्या नेहमी म्हणत, 'माझ्या एका बाजूला बाबा (शिवबाबा) व दुसऱ्या बाजूला दादा (ब्रह्माबाबा) आहेत. तेच कर्ताकरविता आहेत, मी तर केवळ निमित्त आहे.' असा हा निमित्त भाव दादीजींमध्ये नसा-नसांत भरला होता. त्यामुळे त्यांना कोणी कधीही चिंताग्रस्त पाहिले नाही. कितीही मोठं कार्य असो, ते अगदी सहजगत्या पूर्णत्वाला जात असे. त्याचे प्रत्यक्ष उदाहरण म्हणजे ज्ञानसरोवर, शांतिवन, ग्लोबल हॉस्पिटल, ओरिया ग्राउंडवरील विशाल उद्यान, ॐ शांती भवन, म्युझियम... अशा प्रॉजेक्टस्चे नवनिर्माण कार्य त्यांच्या प्रशासन काळात संपन्न झाले.

दादीजींचे व्यक्तिमत्व म्हणजे जणू उमंग-उत्साहाचा धबधबाच होता. प्रत्येक दिवसामध्ये नवीनता भरून, त्याला उत्सवाचे रूप देण्याची कला त्यांच्यात होती. त्यामुळे संपूर्ण ब्राह्मण परिवारात चैतन्य व उमंग-उत्साह भरला जात असे. दादीजींच्या कुशल नेतृत्वाखाली आपली संस्था खऱ्या अर्थी विश्व-विद्यालय बनली. फलस्वरूप विश्वातील सर्व आत्म्यांपर्यंत परमात्मा शिवपित्याचा संदेश पोचवता आला. तसेच 'एक ईश्वर, एक विश्व परिवार' ही भावना सर्वत्र पसरली. म्हणूनच आदरणीय दादी प्रकाशमणीजींचा स्मृतीदिवस (२५ ऑगस्ट) हा आपल्या संस्थेद्वारे 'विश्वबंधुत्व दिवस' म्हणून मोठ्या उत्साहाने साजरा केला जातो. (त्यानिमित्त यावर्षी दि. १९ ऑगस्ट २०१८ रोजी आंतरराष्ट्रीय मॅरेथॉन रेसचे आयोजन (मनमोहिनी कॉम्प्लेक्स ते ओम् शांतीभवन-२२कि.मी.) करण्यात आले आहे.)

अशा त्याग-तपस्या-सेवामूर्त, प्रेरणामूर्त, दिव्यतामूर्त, वरदानीमूर्त बापसमान संपन्न व संपूर्ण दादीजींनी २५ ऑगस्ट २००७ रोजी आपल्या नश्वर देहाचा त्याग केला व त्या अव्यक्त वतनवासी बनल्या. त्यांच्या ११ व्या स्मृतीदिनानिमित्त आम्हा सर्व ब्रह्मावत्सांचे कोटी कोटी प्रणाम!

**प्रकाशमणी दादाजींच्या स्मृतीस,**
**करूया सारे वंदन!**
**शिवयज्ञाच्या सेवेसाठी अहोरात्र,**
**झिजले जणू चंदन ।।**

**–ब्रह्माकुमार शिवाजी**



# भारताला स्वर्ग बनविणारे अलौकिक रक्षाबंधन

**ब्र. कु. गोदावरी दीदी, मुलुंड**

दरवर्षी श्रावण पौर्णिमेला रक्षाबंधनाचा सण भारतात मोठ्या उत्साहाने व आनंदाने साजरा केला जातो. भावा-बहिणीच्या पवित्र प्रेमाचे हे प्रतीक आहे. रेशमाच्या धाग्याला मध्यभागी गाठ असलेली राखी, बहीण भावाच्या मनगटावर बांधते आणि स्वतःच्या रक्षणाची भावाकडे मागणी करते. भावाबहिणीचे प्रेम हे रेशमाच्या धाग्याप्रमाणे मृदु मुलायम आहे तर त्या धाग्यावरील गाठ ही रक्षणासाठी सदैव तत्पर राहण्याच्या बंधनाचे प्रतीक आहे. आपल्या भावाकडून रक्षणाची अर्थात मानसिक आधाराची अपेक्षा करणे, हा स्त्री मनाचा एक नाजूक पैलू आहे. अशाप्रकारे परंपरागत पद्धतीने हद्दचे वा लौकिक रक्षाबंधन साजरे केल्यामुळे, आज केवळ भाऊ आपल्या बहिणीची रक्षा करण्याचे बंधन पाळण्याचा प्रयत्न करतो. परंतु दुसऱ्या स्त्रियांविषयी त्याची दृष्टी-वृत्ती तितकीशी पवित्र नसते. परिणामतः दिवसेंदिवस समाजात स्वैराचार-पापाचार झपाट्याने वाढत चालला आहे. त्याचाच परिणाम म्हणजे आजकाल बलात्काराच्या, गँगरेपच्या घटना दिवसेंदिवस वाढत चालल्याचे दिसून येते. **यावरून स्पष्ट होते की, रक्षाबंधनाच्या सण साजरा करूनही समाजाचे नैतिक अधःपतन तीव्र गतीने होत आहे. परिणामतः ही कलियुगी सृष्टी नर्कतुल्य बनली आहे. अशा या नर्कतृल्य सृष्टीला पुन्हा स्वर्गतुल्य बनविण्यासाठी, आता संगमयुगात परमपिता शिव परमात्मा, आत्म्यांना पवित्रतेच्या प्रतिज्ञेची राखी बांधत आहेत अर्थात अलौकिक रक्षाबंधनाचा महोत्सव साजरा करीत आहेत.**

**संपूर्ण संगमयुग हेच रक्षाबंधनाचे पावन पर्व :**

लौकिक रक्षाबंधनाचा सण हा श्रावण पौर्णिमेच्या दिवशीच साजरा केला जातो. परंतु अलौकिक रक्षाबंधन संपूर्ण संगमयुगाच्या कालखंडात चालू असते. अलौकिक रक्षाबंधन अर्थात अपवित्रतेपासून (अर्थात पाच विकारांपासून) आत्म्याची रक्षा करण्यासाठी बांधले जाणारे पवित्रतेचे बंधन. आपण हे जाणतो की निराकार परमपिता शिव परमात्मा व प्रजापिता ब्रह्माबाबांची आपण मुले असल्याने, सर्व आपापसात भाऊ-बहीण आहोत. त्यामुळे आपले संबंध अतिशय प्रेमपूर्ण, मधुर व पवित्र असले पाहिजेत. परंतु आत्मविस्मृती व कलियुगातील अति धर्मग्लानीमुळे मनुष्य आपल्या खऱ्या संबंधांना व स्वधर्माला विसरला आहे. (पवित्रता व शांती हा आत्म्याचा मूळ स्वधर्म आहे.) काम-क्रोधादी विकारांच्या वशीभूत होऊन तो आपली आत्मिक शक्ती गमावून बसला आहे. भोगविलासिता आणि वासना यांच्या महापुरात तो बुडत चालला आहे.

अशा समयी पावन सत्ययुगी राजधानीची पुनर्स्थापना करण्यासाठी, भारताला पुन्हा स्वर्ग बनविण्यासाठी, रक्षाबंधनाच्या पावन पर्वावर पवित्रतेचा ईश्वरी संदेश जन-जन पर्यंत प्रजापिता ब्रह्माकुमारीज संस्थेद्वारे दिला जातो. **वास्तविक काम विकार हाच मानवाचा महा शत्रू आहे. त्यापासून मुक्त होण्यासाठी पवित्रतेचे बंधन बांधणे अति आवश्यक आहे. त्याद्वारेच मन सात्विक बनेल. तसेच दृष्टी, वृत्ती व कृती शुद्ध होईल. तात्पर्य म्हणजे पवित्रता हाच आत्म्याचा सर्वश्रेष्ठ शृंगार आहे.** पवित्रतेच्या जोरावरच आपल्या पूर्वजांनी (अर्थात देवी-देवतांनी) मृत्युवर विजय प्राप्त करून, अमर देवपद प्राप्त केले होते.

या अनुषंगाने एक पौराणिक कथा आहे की यमाने आपली बहिण

यमुनाकडून पावन राखी बांधली व तिला वचन दिले की हे पवित्र बंधन बांधणारा मनुष्य यमदूतांच्या भयापासून मुक्त होईल. दुसरी कथा अशी आहे की जेव्हा देवराज इंद्राला असुरांनी युद्धात हरवले तेव्हा त्यांना आपले स्वर्गाचे राज्य गमवावे लागले. त्यानंतर इंद्राणीने इंद्राला पावन राखी बांधली. फलस्वरूप इंद्राला आपले गमावलेले राज्य पुन्हा प्राप्त झाले. तात्पर्य म्हणजे आज खरी आवश्यकता आहे ती रक्षाबंधाचे आध्यात्मिक रहस्य जाणून, पवित्रतेचे बंधन बांधण्याची. या अनुषंगाने एक कवी म्हणतो –

**श्रेष्ठ वेळ ही कल्पांतीची,**
**संगमयुग ही महती त्याची ।**
**याच समयी शिव परमात्मा,**
**देई प्रतिज्ञा पावित्र्याची ।**
**याच स्मृतीचा आहे हा सण,**
**रहस्य याचे घ्या समजावून ।**

संगमयुगात परमात्मा शिव पिता रक्षाबंधनाचे पर्व सर्व आत्म्यांच्या कल्याणासाठी साजरे करतात. ते अति धर्मग्लानीच्या वेळी अवतरित होऊन, नर व नारी दोघांना पवित्रतेचे बंधन बांधतात अर्थात त्यांना ते वचनबद्ध करतात की काम, क्रोध, लोभ, मोह, अहंकाररूपी मायेपासून (अपवित्रते-पासून) आम्ही स्वतःची रक्षा करू. त्यांचा सहाय्यक स्वयं परमात्मा बनतो.

**अलौकिक रक्षाबंधनाचे अनन्यसाधारण महत्त्व :**

अलौकिक रक्षाबंधनाद्वारेच परमात्मा, कलियुगी पतित सृष्टीला पावन बनवितात. फलस्वरूप भारतभूमी पुन्हा स्वर्गभूमी बनते. म्हणून परमात्म्याला स्वर्गाचा रचयिता (Heavenly God Father) असे म्हटले जाते. असे हे पवित्रतेचे बंधन, माया अर्थात पाच विकारांच्या बंधनातून मुक्त करणारे आहे. म्हणूनच रक्षाबंधन प्रत्येक आत्म्याला प्रिय आहे. त्यात स्वतःला बांधून घेणे हे त्याला आवडते कारण त्यातच त्याचे परमहित वा परम कल्याण सामावलेले आहे. याद्वारेच विश्वात आध्यात्मिक क्रांती घडून येते व सूंपर्ण विश्व नंदनवन बनते. या अनुषंगाने असे म्हणता येईल –

**रक्षाबंधन पवित्र बंधन,**
**बांधून सारे व्हा निर्बंधन ।**
**पवित्रतेच्या या शक्तीने,**
**विश्व होई पुन्हा नंदनवन ।।**

सारांशाने हे लक्षात ठेवा की, वर्तमान समय हा संगमयुगाचा आहे. याच वेळी आत्मा पुरुषोत्तम अर्थात उत्तम पुरुष बनतो. त्यासाठी पवित्रतेचे अलौकिक रक्षाबंधन करणे, अति आवश्यक आहे. याद्वारेच आत्मा पावन बनून, स्वर्गीय पावन दुनियेत राज्य अधिकारी बनतो. तसेच सत्ययुग-त्रेताच्या अंतापर्यंत आत्मा पवित्र रहातो. त्यानंतर द्वापरयुगापासून सुरु होणाऱ्या भक्तिमार्गात लौकिक रक्षाबंधनाची प्रथा पुन्हा सुरू होते.

**अलौकिक रक्षाबंधनाची विधी :**

जे ब्रह्मावत्स आधी स्वतःला पवित्रतेचे पक्के कंगन बांधतात तेच दुसऱ्यांना हे कंगन बांधू शकतात. मनसामध्ये सुद्धा अपवित्रतेचा संकल्प येता कामा नये, हे व्रत जे घेतात, त्यांच्याच पवित्रतेच्या आकर्षणाचा प्रभाव दुसऱ्यांवर पडतो. त्यामुळे केवळ एक प्रथा म्हणून, दुसऱ्यांना राखीचा संदेश न देता, त्यांचे भाग्य बनविले पाहिजे अर्थात त्यांना भाग्य बनविण्याची प्रेरणा दिली पाहिजे.

यासाठी सर्वप्रथम स्वरक्षक बनणे आवश्यक आहे अर्थात शुद्ध संकल्पाद्वारे स्वतःची रक्षा केली पाहिजे. परिवाराविषयी मनात सदैव शुभभावना असली पाहिजे. कधीही कुणाविषयी अशुभ विचार येता कामा नये. असे स्वरक्षक व परिवार रक्षक आत्मेच विश्वरक्षक बनू शकतात. **पतित पावन निराकार परमात्मा संगमयुगात ब्रह्मामुखाद्वारे आत्मारुपी मुलांना डायरेक्शन देत आहेत, "बच्चे, काम महाशत्रु है, इस महाशत्रुपर जीत पहनने से तुम कृष्णपुरी में चले जायेंगे। इसलिए ही राखी के बाद श्रीकृष्ण जन्माष्टमी मनाते है। अभी तुम पवित्र ब्राह्मण बनो, तो फिर देवता बन जायेंगे।"**

**आजवर ज्या ब्राह्मणांनी अलौकिक राखी बांधली आहे, त्यांनी आपली अवस्था एकरस बनविण्यासाठी, साक्षीपणाची राखी बांधली पाहिजे. ही साक्षीपणाची राखीच सेवेत सफलता प्रदान करेल, जितके आपण साक्षी बनू तितकेच**

साक्षात्कार मूर्त व साक्षात् मूर्त बनू.


अशाप्रकारचे अलौकिक रक्षाबंधन केवळ प्रजापिता ब्रह्माकुमारीज् तर्फे संपूर्ण विश्वभरात केले जाते. फलस्वरूप सर्व आत्म्यांना पवित्रतेचा संदेश प्रदान करून, ईश्वरीय स्नेहसूत्रात बांधण्याचा प्रयत्न केला जातो. येथे कुठल्याही प्रकारचे जाती, धर्म, भाषा, संस्कृती, उच्च-नीच, श्रीमंत-गरीब असे भेद नाहीत. **अशा संस्थेत येऊन रक्षाबंधन बांधणे म्हणजे जणू अविनाशी सद्भाग्य आपल्या गाठीशी बांधण्यासारखे आहे. म्हणूनच रक्षाबंधनाच्या पावन पर्वावर आपण प्रजापिता ब्रह्माकुमारीज्च्या जवळच्या सेवाकेंद्राला अवश्य भेट द्या व लवकरच या भारत भूमीवर स्थापन होणाऱ्या स्वर्गाचे राज्यभाग्य प्राप्त करा.**

***

## *अमृतवेळेच्या योगाचे महत्त्व*

ब्र. कु. राहूल, कोल्हापूर

- अमृतवेळा ईश्वरीय मीलनाचे सुख अनुभवण्याची वेळ आहे.
- अमृतवेळा परमात्मा पित्याकडून सर्व खजिने प्राप्त करण्याची वेळ आहे.
- अमृतवेळेला परमात्म्याच्या दृष्टीद्वारे शक्ती प्राप्त होते.
- अमृतवेळेला आत्मा लाइट-माइट स्वरूपाचा अनुभव करतो.
- अमृतवेळेला ईश्वरीय स्नेहाचा अनुभव होतो.
- अमृतवेळेला आत्म्याला परमात्म्याची पालना प्राप्त होते.
- अमृतवेळेला ईश्वरीय स्मृतीचे सुरक्षा कवच प्राप्त होते.
- अमृतवेळा तिन्ही लोकाची यात्रा करण्याची पावन वेला आहे.
- अमृतवेळेला आपल्या विकर्मांचा विनाश होतो.
- अमृतवेळा मन-बुद्धीला एकाग्र करण्याचा समय आहे.
- अमृतवेळा आपले पुण्याचे खाते वाढविण्याचा समय आहे.
- अमृतवेळा महादानी, वरदानी बनण्याचा समय आहे.
- अमृतवेळा अमृततुल्य समय आहे.
- अमृतवेळा विश्वाला शांतीचा सहयोग देण्याची वेळ आहे.
- अमृतवेळेला आपले संस्कार श्रेष्ठ बनविण्याची वेळ आहे.
- अमृतवेळेला आपल्या महान भाग्याचे दरवाजे उघडतात.
- अमृतवेळा इंद्रियजीत बनण्याचा समय आहे.
- अमृतवेळा स्वमानधारी बनण्याचा समय आहे.
- अमृतवेळा सर्वश्रेष्ठ जीवन बनविण्याची वेळ आहे.



– सारांशाने जो जितका अमृतवेळेला सफल करतो, तो तितका पद्मापदम् भाग्यशाली बनतो.



# आपलं विश्वच वेगळं.....

**ब्र. कु. अनुराधा, पुणे**

शिवबाबांनी दिलेल्या ज्ञानाची ओळख झाली, त्याला आतां जवळजवळ साडे तीन वर्षे होतील. हळूहळू त्याचं मर्म लक्षात येतं. अर्थ उद्देश कळू लागतो. अजून खूप कळायचं आहे. हे सुद्धा उमजतं. तरी सुद्धा केवढा मोठा फरक पडला आहे आपल्या आंतरिक जगण्यात, असं जाणवूं लागलं आहे.

एक म्हणजे आपण मूळात शांतस्वरुप आहोत. हे कळलेलं सत्य. इतक्या जन्मात (बाबा सांगतात त्याप्रमाणे ६३ जन्मात आधी हे कुठे माहिती होतं?) अशांतीची अशी काही सवय होऊन गेली आहे की शांती अप्राप्यच वाटत होती. पण कळलं की ती मिळू शकते. नव्हे ती असतेच! आपल्या आत असते. 'शांति तो मेरे गलेका हार है।' बाबांनी किती सुंदर प्रकारे सांगितलं आहे हे. क्रोध येऊच द्यायचा नाही हे अगदी नवंच म्हणता येत नाही. परंतु बाबा जसं समजावतात तसं कोणी समजावून देऊ शकत नाही. त्यामुळे सतत वाचून, लिहून ऐकून सुद्धा जे जमत नव्हतं ते आता कष्टाने का होईना रागाला परतवता येतं. हे खूप मोठं आहे. फार मोठी उपलब्धी आहे ही!

मोह, लोभ, अपवित्रता, कुठे सुटलय सारे अजून? परंतु कळलं आहे की या षड्रिपुंना आता टाळायचं. पळवूनच लावायचं, त्यासाठी मनात पाहिजे वैराग्य. 'हदका बैराग नहीं, बेहदका बैराग!', आतां हे वैराग्य पाळायचं याची सारी जबाबदारी आम्ही दिली होती संत महात्म्यांना. साधु संन्याशांना. पण नाही. हे आम्ही संसारी लोकांनी, गृहस्थधर्म पाळणाऱ्यांनी करायचं आहे. मला तर वाटतं समर्पितापेक्षाही घर-संसारी लोकांसाठीच आहे हे सारं ज्ञान!

कारण जग अन् आत्मे पतित झाल्यामुळे घर हेच अशांतीचं उगमस्थान होऊन बसलं आहे. 'गृहस्थाश्रम' हा सत्ययुगात होता-पवित्र होता. आता तो 'आश्रम' राहिला नाही. **बाबांची शिकवण आहे ती घराघराला स्वर्ग बनविण्याची. म्हणून मन मिळवणी, हातमिळवणी, क्षमाभाव, झालं-गेलं विसरुन जाण्याची क्षमता आणि तयारी. प्रत्येक दिवस ही नवी सुरुवात आहे असं मानून प्रतिक्षणी उत्साहानं नव काही करण्याची सुरुवात, हे बाबांच्या शिकवणुकीचं सार आहे.**

घराबाहेरच्या जगात भांडणं, संघर्ष, लढाया हे अटळ झालं या कलियुगात. निदान घरात हे नसावं, शांती आणि प्रेम यांच राज्य असाव. तर बाहेरच्या उग्र वातावरणातही काही चांगल घडवता येईल. विधायक कार्ये घडतील. जेवढे आत्मे अधिकाधिक संख्येनं या ज्ञानामुळे स्वच्छ होतील तेवढ्या प्रमाणात वातावरण बदलणार आहे. निर्मळ होणार आहे. सत्ययुगाच्या आगमनासाठी हे आवश्यक आहे.

व्यक्तिगत जीवनात या ज्ञानामुळे पडणारा फरक ही तर सर्वात महत्त्वाची, मोठी गोष्ट. ब्रहमांडाच्या अफाट पसाऱ्यात पृथ्वी लहान आहे हे माहिती होतं. परंतु बाबांनी शिकविलेल्या भूगोलामुळे 'भूगोला' पलीकडचं ज्ञान मिळालं. या पृथ्वीशिवाय ब्रहमांडात काय काय आहे? खगोलात दिसणाऱ्या ग्रह-नक्षत्र-ताऱ्यांशिवाय न दिसणारे असे दोन 'लोक' म्हणजे जगे माहिती झाली. अति अति महत्त्वाची जगे!

या जुन्या पतित जगाचा कंटाळा आला, किंवा इथलं कर्तव्य करुन झालं की निघा - चमकीला ड्रेस घाला नि पिसापेक्षाही हलक्या अशा चमकत्या प्रकाशदेहानं फरिश्ता बनून उडा. देवदूत बना. दृढनिश्चयाचा शेला कमरेला कसा. ज्ञान आणि योगाचे पंख लावा.

सूक्ष्म वतनात – ब्रह्माधामात – चला, कसा दुधाळ शुभ्र प्रकाश पसरला आहे. त्या प्रकाशातच अधिक शुभ्र प्रकाशझोतात बसलेले ब्रह्माबाबा – संपूर्ण फरिश्ता. सगळीकडे दिसतात ते बाबांना भेटण्यासाठी आलेले प्रकाशदेहाचे तरंगणारे देवदूत. गाढ शांती आणि फक्त स्मित हास्यांची देवघेव. खाणाखुणांची भाषा, आवश्यक वाटल्यासच. शब्द नाही – आवाज नाही. सगळीकडे भरुन राहिलेली आहे – स्नेहभावना, क्षमाभाव, करुणा, दया, वत्सलता. ब्रह्माबाबांच्या स्वभावातला गोडवा.

इथे बाबांशी बोलून झालं की मग निघायचं – आधी त्यांचा हात मस्तकावर ठेवून घ्यायला विसरायचं नाही. – देवदूताचा पोशाख त्यागून बिंदुरुपात निघायचं ते परमधामात जाण्यासाठी.

किती-किती-कितीतरी दूर असणारं ते विस्तीर्ण परमधाम – मूल वतन. आपलं – सर्वांच घर. बाबांचं नित्याचं निवासस्थान. आपल्यायोग्य खिडकीमधून आपण आत शिरायचं. आत गेल्यावर किती सुंदर तो प्रकाश पसरलेला असतो तिथे. लाल सोनेरी, पारदर्शक. आत केवळ बिंदुरुप, चमकणारे सूक्ष्म तारे – आपण आत्मे. पुढे गेल्यावर दिसतं ते आत्म्यांचं झाड, उलटं तरंगणारं, परंतु एका जागी स्थिर असणारं. झगमगणारं झाड, कारण त्याच्या बुंध्यात आणि खाली पसरलेल्या फांद्यांवर, वरच्या मूळांवर – सगळीकडे आत्मे बसलेले आहेत. अन् सर्वांच्या वरती तो शांत तेजानं चमकणारा शुभ्र बिंदु-महाज्योति-परमात्मा परमपिता शिवबाबा. मेरा बाबा!

त्याच्या पुढ्यात जायचं – त्याच्याकडून सकाश घेत राहायचं. शक्ती, गुण घ्यायचे हवं तर रुहरिदान (वार्तालाप) करा, हवं तर त्याचं गुणवर्णन. संबंधांचा आनंद लुटा. नाही तर मुखाचे मौन – मनाचे मौन – एकाग्र होऊन ज्वालामुखी योग करा. मग त्याला लाख-लाख धन्यवाद देऊन, त्याचे कोटी-कोटी आभार मानून, कृतज्ञ विनम्र मनानं त्याचा निरोप घ्यायचा. पुन्हा सूक्ष्म वतनात जाऊन देवदूत बनून, ब्रह्माबाबांपुढे काही क्षण राहून, साऱ्या दुनियेला प्रकाश देत देत खाली यायचं. बिंदुरूपात येऊन आपल्या स्तब्ध बसलेल्या शरीराच्या मस्तकात शिरून, स्वस्थानी भृकुटीत विराजमान व्हायचं.

केवढी प्रचंड उपलब्धी ही! साकारी, आकारी, निराकारी तीन रुपातून परमात्म्याला भेटणं, तऱ्हा-तऱ्हांनी भेटणं. तीन लोकांत भ्रमण करणं-पुन्हा तिकीट काढण्याची कटकट नाही! जसं बाबा म्हणतात ना, 'ज्ञान सहज है फिर फीस भी नहीं!' तसंच हे. ही आपली गंमत झाली. परंतु ज्यावेळी प्रथम हे कळतं तेव्हा ऐकणारा आश्चर्यानं अवाक् होतो. किती अद्भुत आहे हे सारं आणि पुन्हा खरं!

**हे ज्ञान देणाऱ्या परमपित्याचे केवढे उपकार आहेत. पण उपकार म्हटलेलं नाही चालायचं. त्याचं प्रेम आहे ते, आकाशाएवढं.**


**आपण पद्मापद्म भाग्यशाली आहोत हे मान्य केलच पाहिजे. म्हणजेच सदा आनंदी राहिलं पाहिजे. नाहीतर त्यानं म्हणून ठेवलंच आहे.**

**'जो खुश नहीं वह बुध्दू है।'**

***

**– आपण शिवबाबांची मुले आहोत. केवळ मुलेच नाही तर अतिप्रिय, लाडकी मुले आहोत. संगमयुगात स्वयं परमात्मा शिव पिता आपली पालना करीत आहे. आपण त्याचे चैतन्य ठाकूर आहोत. तोच आपल्याला साऱ्या विश्वाचे ज्ञान देत आहे. सृष्टिचक्राचे ज्ञान देऊन, त्रिकालदर्शी बनवित आहे. शिवबाबांनी आपल्याला इंजिनियर्सचा इंजिनियर, डॉक्टर्सचा डॉक्टर, प्रोफेसर्सचा प्रोफेसर बनवले आहे. त्यामुळे आपल्या मनात कधीही असा विचार यायला नको की समोरची व्यक्ती इतकी शिकलेली आहे. कारण ज्ञानसागर शिवबाबांनी दिलेले आध्यात्मिक ज्ञान हेच सर्वश्रेष्ठ आहे.**

**– आदरणीय दादी प्रकाशमणीजी**



# सेल्फी

ब्र. कु. नीता, बोरिवली (प.)

आजचे युग 'मोबाईल युग आहे. बाल-वृद्ध, स्त्री-पुरुष, गरीब-साहुकार सर्वजण ह्या मोबाईलच्या आकर्षणामध्ये फसले आहेत. रामायणामध्ये जसे सीतेला सोनेरी हरण मोहीत करून गेले तसेच आज सगळ्यावर ह्या मोबाईलची जादू झाली आहे. काही वर्षांपूर्वी एखादा मनुष्य एकटाच बोलताना दिसला की लोक त्याला वेडा म्हणायचे. पण आज ९०% लोक ह्या मोबाईल मुळे वेडी झालेली दिसून येतात.

आजचा विद्यार्थी वर्ग तर ह्या मोबाईलचा शिकार झाला आहे. एक वेळ अशी होती की मुल-मुली कॉलेज मध्ये गेले की 'त्यांना पंख फुटले, आता त्यांना सांभाळायची गरज आहे' असं पालकांना वाटायचे. परंतु वर्तमान परिस्थिती अशी आहे की जन्माला मुल आल्यापासून पालकच त्या लहान मुलांना अन्न भरवताना मोबाईलवर कार्टून दाखवतात, मोबाईलवर hallo बोलायला शिकवतात. बोलताही येत नसल तरी मोबाईलच्या कितीतरी गोष्टी त्या चिमुरड्यांना ही कळतात. काय ह्या मोबाईलची जादू म्हणायची?

रस्त्यावर चालत असताना अशी ही लोक आपण बघत असाल, जे कुठेही उभे राहून आपला सेल्फी घेतात. ह्या सेल्फीच्या चक्कर मध्ये कितीतरी तरुण मुला-मुलींचे जीव ही गेले तर कित्येकांचे जीवन धोक्यात ही आले. सगळ्यांनाच ह्या मोबाईलचे तसेच सेल्फीचे वेड लागले आहे. कधी-कधी असे जाणवते की मनुष्य बाह्य सुंदरतेवर, बाह्य गोष्टीवर किती प्रभावित झाला आहे. मनुष्याची सुंदरता त्याचे फक्त शरीर नाही परंतु गुणांनी, आचरणानी सुंदर असणे गरजेचे आहे.

**वर्तमान संगमयुगात शिव परमात्म्याने आपल्या सर्वांना स्वतःचे खरे स्वरूप दाखवले. राजयोगाच्या कोर्सच्या पहिल्या दिवसापासून आपण सेल्फी काढायला शिकलो.** आजपर्यंत फोटो काढत असताना वेगवेगळ्या पोझ (pose) घेऊन फोटो काढायचो, हसण्याची इच्छा ही नसताना कृत्रिम हास्य चेहऱ्यावर आणून फोटो काढले. पण नक्की आपली कोणती पोझ (pose) हवी ते लक्षात आले नाही. 'Face is the index of mind' म्हटले जाते. मनाची जशी अवस्था तसे चेहऱ्यावरचे हावभाव. चेहऱ्याची सुंदरता वाढवण्यासाठी मनाची सुंदरता वाढवावी हे आता लक्षात आले. 'मी श्रेष्ठ आत्मा आहे, महान आत्मा आहे... ही श्रेष्ठ पोझ (pose) घेतली तर चेहऱ्यावर तेज दिसून येते.

**'सेल्फी' अर्थात स्वतःच काढलेला स्वतःचा फोटो. तसेच सेल्फ अर्थात मी. तर मी म्हणजे ह्या नश्वर देहामध्ये असलेली अविनाशी शक्ती मी आत्मा. शरीराच्या बंद डब्बीमध्ये असलेला तो अमूल्य हिरा, मी आत्मा. शरीररूपी शिंपल्यात असलेला बहुमोल मोती, मी आत्मा. हे स्वतःचे दर्शन म्हणजेच सेल्फी.** ह्या भौतिक जगात विज्ञानाने असे चमत्कार केले की व्यक्तीचा चेहरा आणि त्याचा फोटो वेगवेगळ्या पद्धतीने बदलून, कोणते वेगळेच व्यक्तिमत्व बनवता येते. म्हणून म्हटले जाते. 'दिखावे पर न जाओ, अपनी अक्कल लढाओ' परंतु आध्यात्मिकता आपल्याला शिकवते की आपण जे आहोत, जसे आहोत तसेच दाखवावे. दुहेरी व्यक्तिमत्व नसावे. दिवसभरामध्ये आपणच आपल्या वेगवेगळ्या तऱ्हा बघू शकतो. प्रत्येक वेळी आपण काही वेगळेच असतो. 'विचार आणि व्यवहार' ह्यात काही वेळा तर ताळमेळ ही नसतो.

**जसे फोटो काढताना खास चेहरा,**

**डोळे, ड्रेस आणि पोझ (pose) ह्यांचे महत्त्व असते. त्याचप्रमाणे सकाळी उठल्यापासून ते रात्री झोपेपर्यंत अनेकानेक व्यक्ती, परिस्थितींना सामोरे जाताना आपण स्वस्थितीचा 'सेल्फी' वारंवार काढावा. शिवबाबा आपल्याला शिकवतात की तुमच्या चेहऱ्याने सेवा व्हावी. मन जर प्रफुल्लित असेल तर चेहऱ्यावर ही आनंद, खुशी दिसून येते. असा टवटवीत चेहरा ईश्वराचा परिचय देतो. जणू चालते-फिरते सेवाकेंद्र आपण बनू शकतो.**

आत्मा एक चैतन्य शक्ती, जी विचारांद्वारे आपली उर्जा सर्वत्र पसरवत असते. पूर्ण दिवसभर प्रत्येक क्षणी माझ्याद्वारे कोणती उर्जा बाहेर जाते. सकारात्मक की नकारात्मक? वर्तमानात आपण जे आहोत ते न राहता, खूप वेळा कृत्रिम (artificial) होतो. भावना नकारात्मक असूनही आपण चेहऱ्यावर खूप चांगले भाव आणतो. पण त्यावेळी सुद्धा आपण जे आहोत त्याचे दर्शन स्वतःलाच होते. मनातल्या गढूळ भावना स्वच्छ करण्यासाठी ईश्वराने स्वदर्शन चक्र फिरवण्याची विधी शिकवली आहे. जसे पाणी गढूळ असेल तर त्यामध्ये तुरटी फिरवली जाते. तुरटी एकाच दिशेने फिरवली तरच पाणी स्वच्छ, पारदर्शक होते तसेच आपण ही स्वदर्शनचक्र फिरवत राहिले तर मनातल्या सर्व व्यर्थ, कलुषित भावना सर्वांसाठी स्वच्छ होतात.

आपले डोळे ज्यामध्ये आपले पूर्ण अंतरंग वा अंतरविश्व दिसू शकते. चेहऱ्याचा महत्त्वपूर्ण हिस्सा आपले डोळे आहेत. एखाद्याशी बोलताना ही आपण त्याच्या डोळ्यामध्ये बघतो कारण त्या डोळ्यामध्ये त्याच्या भावना दिसतात. कधी-कधी तर प्रत्येक वाक्याला भावना बदलतांना दिसतात. भक्तिमार्गामध्ये देवी-देवतांच्या डोळ्याचे खूप महत्त्व आहे. त्या दृष्टीमध्ये प्रत्येकासाठी प्रेम, करुणा भरलेली दिसून येते. तसे नयन आपले ही असावे, ह्यासाठी आत्मिक दृष्टी ठेवावी. त्यासाठी रोज ज्ञानाचे अंजन लावावे, जेणेकरून आपले डोळे ही आकर्षक बनतील.

एखादा सुंदर ड्रेस घातला की सहजच आपली चाल बदलते. त्याचप्रमाणे रोज स्वमानाचा अर्थात उच्च स्थितीचा ड्रेस घातला तर तशी स्थिती आपण बनवू शकतो. मी ईश्वराचा राइट हँड (right hand) आहे. मी मास्टर सर्वशक्तिवान आहे, मी फरिश्ता आहे... जेव्हा ह्या स्मृती जागृत होतात तेव्हा आपली स्थिती श्रेष्ठ आणि कर्म ही श्रेष्ठ बनतात.


व्यक्ती आपल्या कर्मांनी, गुणांनी महान बनतो. झाडावर जितकी फळ जास्ती तितके ते झाड वाकलेले दिसते. परंतु आज मनुष्याला काही पदाधिकार मिळाले की तो तितकाच अहंकारी बनू लागतो. परंतु व्यक्ती जितका महान तितका नम्र असला पाहिजे. ईश्वर ही स्वतःला आज्ञाधारक सेवक (obedient servant) म्हणतो. ती नम्रता आपल्यामध्ये सुद्धा यावी. त्याकरिता मुरलीमध्ये वारंवार 'विश्वकल्याणकारी, विश्वसेवाधारी...' असे स्वमान (titles) आपल्याला दिले जातात, जी सर्वात उच्च स्थिती आहे. हेच खरे प्रभावशाली व्यक्तित्व आहे.

बाह्य जगातील सुंदरता आज आहे. कालांतराने त्याचे ही रूप बदलते. पण आंतरिक सुंदरतेला जोपासण्याचा ध्यास, आपण सर्वांनी घ्यावा. हे संगमयुग आहे, जिथे स्वयं शिव परमात्मा आपल्याला सुंदर बनवायला आला आहे. रोज नव-नवीन युक्त्या (tips) आपल्याला मिळत आहेत. त्याचा अवश्य लाभ घ्यावा.

**जसे प्रत्येक व्यक्तीला आपला फोटो बघण्यात आनंद मिळतो. फोटोमध्ये खूप जण असले तरी तो स्वतःला शोधत राहतो. तसेच ह्या विश्वात अनेक लोक जगत आहेत पण आपण आपले जीवन इतके सुंदर बनवावे, जेणेकरून नेहमीच स्वतःला बघत राहण्याचा आनंद आपण मिळवू शकू. हाच तर खरा सेल्फी आहे.**

***

**- प्रत्येक ब्रह्मावत्साने स्वतःला विचारा की या जगात माझ्या इतका सुखी कोणी आहे का? महान कोणी आहे का? तर अंतःकरणातून हेच उत्तर मिळेल की मी सर्वांपेक्षा सुखी आहे, महान आहे. कारण आपण सर्वश्रेष्ठ सद्गुरु शिवबाबांच्या श्रीमतावर चालत आहोत, श्रेष्ठ योगी आहोत, परम पवित्र आत्मे आहोत.**



# मोह या विकारावर विजय

**ब्र. कु. तुकाराम, भांडुप**

भगवान धर्म-ग्लानीच्या वेळी अवतीर्ण होऊन मनुष्यमात्राला जे गीता-ज्ञान सांगतात, त्याचा उद्देशच मुळी माणसाला 'नष्टोमोह: स्मृतिर्लब्धा' बनविणे हा असतो. कारण मोहापायीच माणूस दुःखी होतो. मोह-ममताच माणसाला वारंवार गर्भ-जेलमध्ये घेऊन जाते आणि अशा एका दलदलीत रूतवून टाकते की माणसाला त्यातून बाहेर निघावे, असे कितीही वाटले तरी तसे करणे त्याला जमत नाही. जसा घाणीतला किडा निकृष्ट आकर्षणाने बांधल्यासारखा असल्यामुळे तेथेच पडून राहतो आणि तेथून बाहेर पडू इच्छित नाही. तसेच मोहात पडलेल्या माणसांचीही हीच गती होते. कफ, रक्त आणि हाडामासाच्या शरीराला तो एक जळू किंवा गोचिडीप्रमाणे चिकटून बसतो आणि त्यापासून हटविल्यास म्हणतो की, ''मी मारला गेलो.'' किती आश्चर्य की वारंवार भट्टीत पडूनही तो स्वतःला मोहाच्या ओझ्यापासून मुक्त करत नाही.

**मोहवश माणसाची बुद्धी परमात्म्याच्या विपरीत असते :**

जर माणसाचा आपल्या मुला-बाळात, नातवंडात, धन-दौलतीत, प्रतिष्ठेत किंवा आपल्या शरीरामध्ये मोह असेल तर त्याची बुद्धी त्यांच्यातच गुंतून पडते त्यामुळे ती परमात्म्याशी विपरीत होत जाते. त्यामुळे त्याला मुक्ती तसेच जीवनमुक्ती प्राप्त होत नाही. 'अंते या मतिः सा एव गतिः' या नियमानुसार त्याला पुन्हा त्याच संबंधीतांपाशी जन्म घेऊन दुःख भोगावे लागते. तो पुन्हा-पुन्हा नर्कवासी होतो. **अशा प्रकारे मोहाचे धागे जरी सूक्ष्म आणि अदृश्य असले तरी ते स्थूल रस्सी अथवा बेड्या याहूनही मजबूत असतात. ते जन्मजन्मांपर्यंत तुटत नाहीत. स्थूल धागे तर शरीराला बांधतात परंतु मोहाचे धागे तर आत्म्याला बांधून ठेवतात.** परंतु आश्चर्य हे आहे की, तरी देखील माणूस या धाग्यांपासून सुटण्याचा प्रयत्न करीत नाही. मोहवश झालेला माणूस सत्य आणि असत्य यामधला भेद समजू शकत नाही. मृत्यूपूर्वीच तो कित्येकदा ममतेकडून मारला जातो. तात्पर्य म्हणजे दिसण्यात जरी मोह हा छोटा विकार असला तरी वास्तविक तो सर्वात मोठा आहे.

''आम्हाला मोह सोडवा वाटतो परंतु तोच आम्हाला सोडत नाही'' असं काही लोक म्हणतात. परंतु त्यांचे हे म्हणणे एका कथेतल्या पोपटाप्रमाणे आहे. एक पोपट वृक्षाच्या एका डहाळीला पकडून बसला होता आणि ओरडत होता की, ''अरे कोणी मला या डहाळीपासून सोडवा रे.'' त्याचे हे ओरडणे ऐकून एका शहाण्या माणसाने त्याला म्हटले, ''अरे पोपटा! डहाळी तर तू स्वतःच पकडून ठेवली आहेस, तेव्हा तू स्वतःच तिला सोडून दे ना? अरे, तू तिला जेव्हा सोडशील तेव्हाच ती सुटेल.'' याच प्रकारे, आज माणसाने आपल्या मोहरूपी पंजात व्यक्ती आणि वस्तूंना स्वतःच पकडून ठेवले आहे. परंतु तो म्हणतो की मला त्यांच्यापासून सोडवा.

**सर्वात महत्त्वाची गोष्ट म्हणजे या विश्वनाटकात कोणी आपला नाही. तसेच कोणी परका नाही. प्रत्येक आत्मा या विश्वनाटकात आपली भूमिका बजावित आहे. त्या भूमिके (पार्ट) अनुसार जो आज आपला आहे तो उद्या परका होईल. याउलट आज जे परके आहेत, उद्या ते आपले होतील.** कर्म संबंधांच्या आधारे भाऊ-भाऊ, स्त्री-पुरुष जे आज एक दुसऱ्यासाठी जीव द्यायला तयार आहेत तेच उद्या एक दुसऱ्याचा जीव घ्यायला सुद्धा तयार

होतात. **त्यामुळेच परमपिता शिव परमात्म्याने श्रीमत (श्रेष्ठ मत) दिले आहे की, 'देह व देहाच्या संबंधांना विसरून, स्वतःला आत्मा समजा व सर्व संबंध एक परमात्म्याशी (शिवबाबांशी) जोडा.''** शिवबाबांनी सर्व दैहिक संबंध बुद्धीने विसरायला सांगितले आहे. संबंध तोडायला मात्र सांगितले नाहीत. त्यामुळे बुद्धीने संबंध विसरून देखील सर्वांबरोबर आपले कर्तव्य अवश्य करायचे आहे. तसेच आपल्याला देहात सुद्धा मोह ठेवायचा नाही. परंतु त्याची आवश्यक ती काळजी अवश्य घ्यायची आहे. कारण वर्तमान समयी या देहाच्या द्वारेच आपण श्रेष्ठ पुरुषार्थ करू शकतो. तात्पर्य म्हणजे परमात्म्याबरोबरच सर्व आत्म्यांचे सर्व संबंध आहेत आणि परमात्माच आत्म्यांना सर्व संबंधाचा रस अनुभव करवतो.

**आता संगमयुगात परमात्मा आपला सर्व संबंधी बनला आहे. (याचेच गायन आपण भक्तिमार्गात करीत होतो – 'त्वमेव माताश्च, पिता त्वमेव...') त्यानेच श्रीमत दिले आहे की माझ्याशी सर्व संबंध जोडून त्याचे सुख अनुभव करा. फलस्वरूप तुम्हाला अंतिम समयी कुठल्याही लौकिक संबंधाची आठवण येणार नाही. याउलट जर परमात्म्याशी एकाही संबंधाचा अनुभव कमी असेल तर तोच संबंध अंतिम समयी आपल्याकडे खेचेल. म्हणूनच एक परमात्म्याशी सर्व संबंध जोडा व सर्व स्मृतिस्वरूप बना. सदैव लक्षात ठेवा – 'एक बाप दुसरा कोणी नाही.' हीच आहे मोहावर विजय प्राप्त करण्याची सहज विधी.**

***

## श्रीकृष्ण भारतात पुन्हा लवकरच येणार आहे.



**भारतातील भ्रष्टाचार, पापाचार, हिंसाचार व धर्मग्लानी पाहून, भारतवासी श्रीकृष्णाच्या पुन्हा आगमनाची आशा ठेवतात. कारण गीतेत श्रीकृष्णाचे महावाक्य आहे की, 'मी धर्मग्लानीच्या वेळी पुन्हा येईल.' परंतु भारतवासीयांना हे माहित नाही की या कलियुगी, अपवित्र भ्रष्टाचारी सृष्टीवर देवता पाऊलसुद्धा ठेवत नाहीत. श्रीकृष्णासारख्या श्रेष्ठतम देवतासाठी प्रकृती, पदार्थ आणि प्रजा सर्व काही पवित्र व सत्त्वप्रधान पाहिजे. वास्तविक श्रीकृष्ण तर सत्ययुगाच्या प्रारंभी जन्म घेतो व संपूर्ण विश्वावर राज्य करतो. श्रीकृष्णालाच स्वयंवरानंतर श्रीनारायण म्हटले जाते व श्रीराधेला श्रीलक्ष्मी म्हटले जाते.**

**खरं तर गीतेतील हे जे महावाक्य आहे की, 'मी धर्मग्लानीच्या वेळी अवतरित होतो' हे महावाक्य निराकार शिव परमात्म्याचे आहे. तेच प्रत्येक कल्पांती प्रजापिता ब्रह्मा यांच्या शरीरात अवतरित होऊन, आदि सनातन देवी–देवता धर्माची पुनर्स्थापना करतात तसेच महादेव शंकराद्वारे विश्वयुद्धासाठी प्रेरित करून, अधर्मांचा विनाश व भ्रष्टाचारी दुनियेचा महाविनाश करवितात. अशाप्रकारे जेव्हा भ्रष्टाचाराचा अंत व श्रेष्ठाचाराची स्थापना होते तेव्हा विष्णुचे साकार रूप श्रीकृष्ण (श्री नारायण) भारतात जन्म घेऊन, स्वर्गीय दुनियेची पालना करतात.**

**आता भगवान शिव आपली दोन्ही ईश्वरीय कर्तव्ये (स्थापना व विनाश) प्रजापिता ब्रह्मा व महादेव शंकराद्वारे करवित आहेत. तसेच निकट भविष्यात होणाऱ्या ॲटॉमिक तिसरे विश्वयुद्ध व महाविनाशानंतर सत्ययुगी सृष्टीच्या प्रारंभी श्रीकृष्ण पुन्हा लवकरच भारतात येणार आहे.**

**– आदरणीय जानकी दीदीजी**



लेखांक २४ वा

# ईश्वरीय कार्य व्यवहारात आदर्श व्यवस्था संपन्न करण्याची आवश्यकता....

**दिवंगत वरिष्ठ भ्रांता रमेश शाह (मुंबई) यांच्या लेखणीतून**

या लेखमालेत मी आजवर या विषयावर लिहित होतो की, आपण वर्तमान संगमयुगातील तसेच भविष्यातील सत्ययुगी दैवी कारभार कसा करू शकतो. या दरम्यान मी एका वेगळ्या विषयावर माझे विचार या लेखात लिहित आहे.

मागील लेखात मी लिहिले होते की शिवबाबांनी म्हटले आहे, ड्रामा सत्य आहे. ही गोष्ट तेव्हा निघाली जेव्हा आपल्या राधे माताने शरीर सोडले होते आणि मग त्यांना जेव्हा भोग लावला गेला तेव्हा त्यांचा आत्मा शीलइंद्रा दादीजी (संदेशी) यांच्या तनात आला होता. तेव्हा मी त्यांना विचारले की तुम्ही कुठे जन्म घेतला आहे? त्यावर राधेमाता म्हणाल्या की, मी जेव्हा वतन मधून खाली येत होते तेव्हा मी बाबांना म्हटले की बाबा, रमेशभाई मला हा प्रश्न विचारतील की सध्या तुम्ही कुठे आहात, तुम्ही कुठे जन्म घेतला आहे, तर मी त्यांना काय सांगू? बाबा म्हणाले की, मुली मी तुझ्या बुद्धीची लाइन क्लीयर ठेवीन. जर तुला रमेशभाईना सांगायचे असले तर सांग, नसेल सांगायचे तर नको सांगूस. मग राधेमाताने शिवबाबांना म्हटले की, बाबा जसे तुम्ही श्रीमत द्याल तसेच मी करीन. त्यावर बाबा तिला म्हटले की, मुली, रमेशला सांग, हा ड्रामा खराखुरा आहे अर्थात सत्य आहे. म्हणून त्याच्या मर्यादेत राहून सर्व कार्य चालले तर बरे होईल. बाबा म्हणाले की, सृष्टीरुपी ड्रामा बनावटी नाही तर वास्तववादी आहे. ड्रामाचे रहस्य जर बाबांनी अगोदरच सांगितले तर हा ड्रामा वास्तववादी नाही. परंतु बनावटी होऊन जाईल.

महत्त्वपूर्ण गोष्ट ही आहे की, ड्रामा वास्तववादी आहे. परंतु लोक शास्त्राला सत्य मानतात व शास्त्रात म्हटले आहे की, 'ब्रह्म सत्य जगत मिथ्या' ते लोक परमात्म्याला ब्रह्म मानतात म्हणजे केवळ ब्रह्म तत्त्वाला सत्य मानतात आणि जगात ते काही होते ते मिथ्या वा असत्य आहे, असे मानतात. **परंतु शिवबाबा म्हणतात की ड्रामा सत्य आहे आणि असायलाच पाहिजे कारण दर पाच हजार वर्षांनी ड्रामाची पुनरावृत्ती होते. यात प्रत्येक आत्म्याचा पार्ट (भूमिका) सत्य व अविनाशी आहे. म्हणून कोणताही आत्मा या ड्रामाच्या मधूनच परतून परमधाममध्ये जात नाही. तसेच मोक्ष अशी कोणती गोष्ट ही नाही. कुणालाही संपूर्ण मुक्ती मिळू शकत नाही.** प्रत्येक गोष्ट ड्रामानुसार ठरलेली आहे. मग तो ड्रामा मिथ्या कसा म्हटला जाईल.

खर तर शास्त्रकारांसाठी ही समस्या आहे. कारण शास्त्रकार म्हणतात की, परमात्मा सत्य आहे आणि ही सृष्टी परमात्म्याची रचना आहे. आदि शंकराचार्यांनी म्हटले आहे की, 'लिलावत तू कैवल्यम्' म्हणजे परमात्म्याने लिला करण्यासाठी या सृष्टीची रचना केली आहे. तेव्हा एक स्वाभाविक प्रश्न आहे की सत्य परमात्म्याची रचना असत्य कशी काय होऊ शकते? म्हणजेच परमात्म्याची रचना सदैव सत्यच असली पाहिजे, ज्याला संस्कृतमध्ये म्हणतात की सत्येन सत्य जायते!

अशा प्रकारे दुसरा प्रश्न असा आहे की– एकीकडे म्हणतात की जगत मिथ्या आहे आणि दुसरीकडे म्हणतात की परमात्मा कणाकणात व्याप्त आहे. अशा प्रकारच्या मान्यता कशा काय सत्य असू शकतात? संस्कृतमध्ये म्हणतात की असतेन् सत्य किम जायते? म्हणजेच जर जगत असत्य आहे तर या असत्य जगतामध्ये परमात्मा

कणाकणामध्ये कसा असू शकतो? अशा प्रकारे ब्रह्म सत्य आणि जगत मिथ्याबाबत प्रश्न उद्‌भवतो. शिवबाबाने दिलेल्या ज्ञानानुसार हे म्हणू शकतो की परमात्मा सुद्धा सत्य आहे तर ड्रामासुध्दा सत्य आहे.

सर्व शास्त्रकार 'ब्रह्म सत्य जगत मिथ्या' असे नाही मानत. श्रीमद्-भगवद्‌गीतेमध्ये सांख्ययोग आहे, त्याला मानणारे लोक म्हणतात की परमात्मा, प्रकृती आणि पुरुष (आत्मा) शाश्वत आहेत. प्रकृती आणि पुरुष यांमध्ये केवळ परिवर्तन होते ते कधी नष्ट होत नाहीत. प्रकृती प्रथम सत्त्वप्रधान असते आणि मग सत्त्व, रजो, तमो अवस्थेला येते. त्याचप्रमाणे आत्मेसुध्दा प्रथम सत्त्वप्रधान आणि मग सत्त्व, रजो वा तमो अवस्थांमधून जातात. म्हणजेच आत्म्यांची केवळ स्थिती बदलते, संख्या नाही. असे सांख्ययोगात म्हटले आहे.

मी शास्त्र किंवा शास्त्रकारांवर टीका करीत नाही. परंतु परमात्म्याद्वारा जे आम्हाला ज्ञान मिळाले आहे त्या आधाराने मी या गोष्टी लिहित आहे. शास्त्रकारांनी अद्वैतवाद सांगितला आहे म्हणजे परमात्मा एक आहे, अजर, अमर, अविनाशी आहे. परमात्मा शाश्वत आहे, ही गोष्ट आदर्श आहे परंतु कालांतराने शास्त्रकारांच्या विचारांमध्ये परिवर्तन आले. मग त्यांनी शुद्ध अद्वैतवाद सांगितला. काही पंडितांनी विशुद्ध अद्वैतवाद सांगितला आणि मग तिसरी विचारधारा असणाऱ्या पंडितांनी शुद्धाशुद्ध अद्वैतवादाची व्याख्या केली. अशा प्रकारे त्यांच्या विचारांमध्ये कालानुरुप परिवर्तन येत गेले. मी येथे अद्वैतवादाच्या विस्तारात जात नाही. अन्यथा लेख खूप लांबला जाईल. परमात्मा एक आहे. सर्वांचे रचयिता आहेत, पिता आहेत. गीतेच्या चौथ्या अध्यायात श्रीकृष्णाने अर्जुनाला सांगितले कि माझे व तुझे अनेक जन्म झाले आहेत परंतु मला माझे सर्व जन्म आठवतात आणि तुला आठवत नाहीत. म्हणून हे गीतेचे ज्ञान मी तुला पुन्हा देत आहे. प्रथम हे ज्ञान मी सुर्याला दिले, सूर्याने मनुला दिले, मनूने मग इक्ष्वाकूला दिले आणि कालांतराने हे ज्ञान प्रायःलोप झाले आज मी पुन्हा ते तुला देत आहे.' या गोष्टीवर ही शास्त्रकाराचे मतभेद आहेत. कारण परमात्माने सूर्याला ज्ञान दिले. अशी कोणतीही गोष्ट दशावतारांच्या माहितीमध्ये नाही. तर मग परमात्माने सूर्याला हे ज्ञान कसे काय दिले असेल? आणि दिले असेल तर ती गीता, आदि गीता झाली. त्या आदि गीतामध्ये काय आहे, हे कुणालाच माहिती नाही आणि मग प्रश्न उद्‌भवतो की मग परमात्माने सूर्याला कोणत्या रुपामध्ये ज्ञान दिले. वर्तमानकाळातील विज्ञानयुगात आपण जाणतो की, सूर्य एक तेजस्वी तारा आहे. भक्तिमार्गात सूर्याला सूर्यनारायण म्हणतात. तर सूर्याचा मनुष्य अवतार कसा असू शकेल? तसेच त्याला कोणत्या रूपात परमाम्याने ज्ञान दिले असेल हा पण प्रश्नच आहे. मग सूर्याने मनूला ज्ञान दिले ते सुद्धा कसे दिले असेल हा ही प्रश्न अनुत्तरित राहतो. कारण सूर्य हा तारा आहे आणि मनू मनुष्यांचा आदि पिता आहे. (जशी ब्रह्माची संतान ब्राह्मण आहेत तसे मनूची संतान मनुष्य आहेत.) म्हणजे त्या आदि काळात सूर्याने मनूला म्हणजे मनुष्याला हे गीता ज्ञान कसे दिले असेल आणि मग मनूने इक्ष्वाकूला गीताज्ञान कसे दिले असेल हे सर्व प्रश्न गुह्य आहेत. परमात्मा, सूर्य, मनू आणि इक्ष्वाकू हे सर्व कोणत्या पात्रांची नांवे आहेत, ते सृष्टीवर केव्हा अवतरीत झाले हा ही प्रश्न आहे. नंतर हे गीता ज्ञान कसे काय प्रायःलोप झाले. त्यासाठी कोण निमित्त झाले या अशा अनेक गोष्टींबाबत विचार केला पाहिजे. जर परमात्मा सर्वव्यापी आहे तर त्यांच्या उपस्थितीमध्ये गीताज्ञान कसे काय प्रायःलोप झाले, हे विचार करण्यासारखे आहे. पूर्वी मी जे काही ऐकत असे त्या सर्व गोष्टींना परमात्म लिला समजून, त्याला सत्‌वचन महाराज म्हणत असे आणि त्या अनुसार चालत असे. परंतु आज लेखाद्वारा हे सर्व प्रश्न वाचकांच्या समोर ठेवीत आहे.

उदाहरण दाखल लिहिता येईल की, जेव्हा मी रामायण वाचत असे तेव्हा मनांत प्रश्न येई की, रामायण तर तेच आहे परंतु विविध लेखकांनी

पान क्र. २९ वर




जयसिंगपूर : येथे दिव्य नगरी प्रॉजेक्टचे उद्‌घाटन करतांना प्राचार्य सौ. अर्चना जगदाळे, डॉ. राजेंद्र पाटील, स्वाती मॅडम, ब्र. कु. रानी बहेन व अन्य



वणी (चंद्रपूर) : आं. योग दिनानिमित्त आयोजित कार्यक्रमाचे प्रसंगी उपस्थित उपविभागीय पो. अधिकारी श्री. लगाटे, पो. निरीक्षक श्री. खाडे, श्री. गायनार, ब्र.कु. कुंदा दीदी व अन्य.



मा. आबु : आं. योग दिनानिमित्त शाळेचे प्राचार्य मोतीलाल गोयल यांना ईश्वरीय भेटवस्तू देतांना ब्र.कु. दिलीपभाई व राकेश भाई



कासेगाव (सांगली) : शालेय विद्यार्थ्यांच्या सन्मान समारोहात भाषण करतांना ब्र.कु. पद्‌मा दीदी, शेजारी आध्यापक श्री. पवार, डॉ. पाटील व अन्य मान्यवर



गोवा : अद्‌भूत मातृत्व या कार्यक्रमाचे उद्‌घाटन करतांना ब्र.कु. डॉ. शुभदा नील, प्रोफेसर गिरीश, डॉ. लवांदे, ब्र.कु. शोभा दीदी व अन्य



मलकापूर (कोल्हापूर) : सर्कसमध्ये ईश्वरीय संदेश दिल्यानंतर ग्रुप फोटोत सर्कस हेड श्री. संकपाळ, ब्र. कु. वंदना व वर्षा बहेन तसेच उज्वला बहेन



हुपरी : सेवाकेंद्रावर आयोजित कार्यक्रमात नगराध्यक्षा सौ. जयश्री गाट, उपनगराध्यक्ष श्री. जयकुमार बाळगे अन्य नगरसेवक तसेच ब्र.कु. सुनिता व शोभा बहेन दीप प्रज्वलन करतांना



वर्धा : बाल विकास व्यक्तित्व शिबीरात सहभागी मुलांना सर्टिफिकेट दिल्यानंतर, त्यांच्यासोबत ब्र.कु. माधुरी बहेन, लायन्स क्लब अध्यक्ष भ्राता अनिलजी, श्री, स्वप्नीलभाई, समाजसेवक भ्राता रमेशजी व अन्य.




ओतुर (पुणे) : विघ्नहर साखर कारखान्याचे संचालक श्री. सत्यशील शेरकर यांना ईश्वरीय संदेश दिल्यानंतर भेटवस्तू देतांना बी.के. सीमा बेहन



तासगाव : येथील बार असोशिएशनमध्ये 'व्यसनमुक्ती' या विषयावर मार्गदर्शन केल्यानंतर ग्रुप फोटोत ब्र.कु. डॉ. वैशाली बहेन तसेच वकील बंधू



बांबवडे : आ. योग दिनानिमित्त आयोजित कार्यक्रमात मार्गदर्शन करतांना ब्र. कु. संगीता बहेन



करंजीशी (शाहुवाडी) : आं. योग दिनानिमित्त करंजीशी कॉलेजचे विद्यार्थी योगासने करतांना, मंचासीन प्राचार्य श्री. यादव, ब्र. कु. वंदना बहेन व श्री. धावडे



# गणपती बाप्पा मोरया... अन् विघ्नविनाशक स्थिती बनवूया...

**ब्र. कु. हेमंत भाई, शांतिवान, (आबूरोड)**

वर्षाचे तीनशे पासष्ट दिवस जिथे उत्सवच... उत्सव... असा उत्सवांचा देश आहे भारत. तना-मनात उमंग उत्साहाची भरती आणणारे हे उत्सव म्हणजे भारताची शान होतं. हे उत्सव फक्त जीवनात आनंदाचा महापूर आणून हर्षाला उधाण देत नाहीत तर त्यांच्या प्रथा-परंपरांमध्ये विणलेली सूत्र जीवनाला सुंदर आकार देतात. मग ते उत्सव अध्यात्मिक, धार्मिक, ऐतिहासिक असोत की राष्ट्रीय, त्यांच्या गर्भात गुंफली गेलीत ती असंख्य अध्यात्म धर्म-कर्म, ज्ञान-विज्ञान-मनोविज्ञान इत्यादींचे अनेक गुप्त रहस्य. ह्या उत्सवाच्या मालिकेतील महत्वपूर्ण महोत्सव म्हणजे मंगलमूर्ती मोरयाचा गणेशोत्सव होय. यावर्षी तो १३ ते २३ सप्टेंबरच्या दरम्यान आहे.

अवघा महाराष्ट्र गजानना श्री गणरायाच्या उत्सवाच्या रंगात गुलाल अबीरासवे नखशिखांत न्हाऊन निघतो. लोकमान्य बाळ गंगाधर टिळकांच्या दूरदर्शी दृष्टीने विघ्नहर्त्याच्या विघ्नविनाशक शक्तीचे रहस्य कधीच टिपले होते म्हणूनच त्यांनी भारत मातेस गुलामगिरीच्या साखळदंडातून मुक्त करण्यासाठी गणेश उत्सवाला राष्ट्रीय पर्वाचे रुप दिले. **खरे तर धार्मिक, आध्यात्मिक, ऐतिहासिक व राष्ट्रीय ह्या चौपदरी सुंदर शालूने सजलेला हाच एकमेव उत्सव होय. हा फक्त लोकरंजन वा मनोरंजनाचा महोत्सव नसून, गणनायकाच्या विघ्नहर्त्या स्वरूपाचे आध्यात्मिक रहस्य स्पष्ट करणारा व निर्विघ्न बनण्याची प्रेरणा देणारा महन्मंगल महा-उत्सव सुद्धा आहे.**

यदा कदा एखाद्या कार्यात विघ्न पडले की मंगलमूर्तीला पाण्यात ठेवतात नि विघ्न टळण्याची वाट पाहतात. कदाचित त्या गणनायकाच्या ठायी असलेल्या श्रद्धा व निष्ठेमुळे विघ्न टळते ही आणि म्हणूनच विघ्नहर्ता अर्थात सुखकर्ता-दुःखहर्त्याचे सर्वजण मनोभावे पूजन वंदन करून, मनातल्या मंगलकामना पूर्ती साठी प्रार्थना करतात. पण या सर्वांच्या तळाशी जाऊन पाहिले तर गणनायकाच्या स्वरूपात यश प्राप्तीच्या अनेक गुप्त युक्त्या दिसतात. बुद्धीचा स्वामी विघ्नहर्त्याची मूर्ती जरा चाणाक्ष नजरेने व सूक्ष्म दृष्टीने न्याहाळली तर, यशाची वाट अडवू पाहणाऱ्या विघ्नांची विल्हेवाट कशी करावी, हे सहज समजून येते.

श्री गणेशाचे भले मोठे पोट, सुपासारखे कान, इवलेसे डोळे, लांबलचक सोंड, चार हात व त्या हातांमध्ये असलेली दोरी, कुऱ्हाड, मोदक व आशिर्वाद देणारा, वरदान लूटणारा हात आणि विशेष म्हणजे बाप्पाच्या अवाढव्य देहास नेणारे इवलेसे उंदिर मामाचे वाहन, हे सगळेच काही नावीन्यपूर्ण आणि आश्चर्यचकीत करणारे नाही का वाटतं? होय. नक्कीच, पण जरा मनन, मंथन केले तर गणराजाचा एकन् एक अवयव वा अंग-प्रत्यंग जणू सफलतेच्या अनेक रहस्यांची तिजोरी उघडणारी गुरुकिल्ली अथवा यशाचे गुप्त मार्ग दाखविणारे वाटाडेच आहेत, हे चांगल्या प्रकारे लक्षात येईल. श्रींच्या मूर्तीत लपलेल्या युक्त्या लक्षात घेतल्या तर प्रगती पथात निर्माण झालेल्या विघ्नांचा विनाश करणे कसे सहज नि सोपे होईल.

**गणनायक म्हणजे बुद्धीची देवता होय. म्हणूनच सर्वात आधी आपण श्रींच्या मंगल-मूर्तीत लपलेले रहस्य जाणूया.**

**१) श्रीगणेशचे इवलेसे नेत्र -** म्हणजे कोणत्याही समस्येच्या समाधानासाठी त्याची बारकाईने म्हणजे सूक्ष्मतेने तपासणी करण्याचे सूचक होय. जसं

एखाद्या रोगाचे निदान करण्यासाठी डॉक्टर रक्त, थूंकी व मल-मूत्र इत्यादींचे सूक्ष्मदर्शी यंत्राद्वारे तपासणी करतात त्यामुळे उघड्या डोळ्यांनी न दिसणारे अति सूक्ष्म जीव जंतू व किटाणू दिसू शकतात. अगदी असेच जेव्हा एखादे विघ्न वाट अडवू पाहते, तेव्हा त्याच्या मूळ कारणाला शोधणे फारच गरजेचे असते. जर समस्येचे कारण समजले तर निवारण ही सहज करता येते. म्हणून संकट पहाडाऐवढे अवाढव्य जरी दिसत असले तरी त्याचे क्षुल्लक कारण ही असू शकते. कधी-कधी समस्येच्या मूळाशी न गेल्याने फालतूचे उपद्व्याप करून डोके दुःखी होते व नंतर छोटीशी चूक कारणीभूत असल्याचे लक्षात येते, अशा गोष्टीसाठी म्हटले जाते, ''खोदा पहाड और निकला चुहा।'' (अर्थात पहाड खोदला अन् त्यातून निघाला उंदीर.) तात्पर्य जर नजर चाणाक्ष, तीक्ष्ण व सूक्ष्म असेल तर समस्येचे कारण लगेच लक्षात येते. ज्याने कारणाचे निवारण वा समस्येचे समाधान सहज संभव होते.

**२) श्रीगणेशाचे सूपासारखे कान –** ''कोणतीही गोष्ट चांगल्या प्रकारे ऐकावी नंतरच त्यावर विचार करून कार्य करावे'' हा मंत्र शिकवितात. गुरु शिष्यास गुरुमंत्र ही कानातच फुंकतो. गुरु म्हणजे गुर शिकविणारा (गुर म्हणजे कला वा विशेष प्राविण्य). म्हणजे गुरुकडून एखादी कला अर्जित करायची असेल, तर त्यासाठी गुरुज्ञान ऐकण्याची वृती व आवड हवी. जेव्हा साधक वा विद्यार्थ्याला लक्ष्यापर्यंत पोहचायचे असेल तर त्यासाठी त्याच्यापाशी असली पाहिजे प्रचंड ऐकण्याची क्षमता – क्षवणशक्ती. श्रवणशील बनल्याने विघ्न विनाशाच्या युक्त्या व हतोट्या सहज प्राप्त होतात. आजच्या बुद्धिजीवी वर्गात संबंध बिघडायचे मूळ कारण आहे आपापसात एकमेकाचे ऐकून घेण्याची उणीव वा कमी वा इतरांचे ऐकण्यासाठी वेळ न देणे होय. त्यामुळे गैरसमज होऊन नको त्या भांडणतंट्याला ऊत येतो. परंतु समोरच्याचे लक्ष देऊन ऐकल्याने त्या इसमाची भाव-भावना समजते व अर्थाचा अनर्थ होऊन, निर्माण होणारे विघ्न आपोआपच नष्ट होते.

**३) श्रीगणेशाचे भले मोठे पोट –** एखाद्या गोष्टीला बुद्धिरूपी पोटात पचवायचीच जणू शिकवण देतात. कधी-कधी व्यक्ती खूप सहन करतो. परंतु ते पोटात पचवत नाही किंवा इतरांचे दोष दुर्गुण दृष्टीत आल्यावर, ते दुसऱ्यास सांगून, उलटी केल्याविना राहत नाही. पण आज ना उद्या ऐकणारा दुसऱ्यास सांगतो आणि दुसरा तिसऱ्यास. अशा प्रकारे एकन् एक दिवस त्या व्यक्तीपर्यंत त्याची केलेली निंदानालस्ती पोहचते व टीका टिप्पणी करणारा नकळत त्याचा विरोधी बनतो व दोघात शत्रूता वाढते. **जसा समुद्र, स्वच्छ व घाण दोन्ही प्रकारच्या नद्या सहज सामावून घेतो. तसाच बुद्धिवान व्यक्ती ही लोकांच्या बऱ्या वाईट गोष्टींना पोटात सहज सामावून घेतल्याने, नसत्या विघ्नाच्या प्रपंचापासून वाचतो. तो इतरांशी विनाकारण वैर मोल घेत नाही. उलट अवगुण पोटात घालून अपकारीवर उपकार करतो** व त्यांच्या नजरेत ही उच्च स्थान मिळवतो.

**४) श्रीगणेशाची लांबलचक सोंड –** म्हणजे गुणग्राहकतेचे प्रतीक होय. दुसऱ्याचे नको ते अवगुण पाहून व मन बुद्धीत ठेऊन, मनुष्य स्वतःच स्वतःची फसगत करतो. परंतु वाईट गोष्टीकडे दुर्लक्ष करून, फक्त दुसऱ्याच्या चांगुलपणाकडे लक्ष दिले तर सद्गुणाच्या समृद्धीने व्यक्तीच्या विकासात वृद्धी होते. जीवनात अनेक दिव्यगुण नसल्यामुळेच व्यक्तिमत्व किंवा चरित्र्याचा विकासाऐवजी विनाशच होतो. म्हणून खरी बुद्धिमानी अवगुण ग्राही न बनता गुणग्राही बनण्यातच आहे.

**५) श्रीगणेशाचे हातात असलेली कुऱ्हाड –** ज्ञानाचे द्योतक आहे. संकट कितीही दुष्कर असो परंतु बुद्धीत ज्ञान असेल तर ते सहज पार करता येते. कारण ज्ञानाला प्रकाश व शक्ती म्हटले जाते (नॉलेज इज लाईट एण्ड माईट) अंधारात सापाला दोरी समजून त्यावर पाय ठेवल्यावर तो चावतो व जीव जातो. त्याचप्रमाणे अज्ञानाच्या अंधारात काम, क्रोध इत्यादी विकाररूपी (सर्पांना) वैरींना ओळखले नाही तर हेच विकार सुख-शांतीचा प्राण घेतात. परंतु दिव्य बुद्धीने विकाररूपी सर्पांना ओळखून, ज्ञानाच्या कुऱ्हाडीने त्यांना मारणे शक्य होते.

**६) श्रीगणेशाचे हातात असलेली दोरी –** संघटन शक्तीला एकतेच्या सूत्राने बांधून एकजूट करायचे प्रतीक होय. जसे दोरीने लाकडांची बांधलेली मोळी सहजासहजी कुणी तोडू व मोडू शकत नाही, परंतु ह्या विपरित एका काठीला तोडणे सहज शक्य होते. म्हणतात ही ''एकीचे बळ देते फळ'' खरंच संघटन मध्ये एकतेनेच वैरीवर विजय मिळतो. त्यासोबत जर व्यक्तिगत संकटाचा सामना करायचा असेल तर आत्म्याच्या मन-बुद्धी-संस्कार तसेच पंचज्ञानेंद्रिय (नाक, कान, मुख, नेत्र व हात) मध्ये जर एकता वा एकजूट असेल तर आत्मा राजा दुर्गुणरूपी शत्रूवर गुणाचे शस्त्र आणि आत्मिक शक्तीच्या सेनेद्वारे आक्रमण करून, त्यास परास्त करू शकतो.

**७) श्रीगणेशाचा वरदान वा आशिर्वाद देणारा हात –** ''दुवा द्या आणि दुवा घ्या'' हा मोलाचा मंगल व कल्याणकारी संदेशच देतो. नाही का? विघ्नाचे सर्वात मोठे कारण म्हणजे ईर्ष्या-द्वेष-घृणेमुळे मनात उपजलेल्या दुर्भावना होत. दुर्भावनांचे सदाकाल दुष्परिणामच पहायला मिळतात तसेच स्वतः व इतरांच्या अकल्याणाशिवाय काहीच हाती लागत नाही. ह्या उलट अति भयंकर हिंस्त्र-पशु सम व्यक्तीला दिलेल्या दुवा, आशीर्वाद व शुभकामना-शुभभावना दिर्घकाळानंतर का होईना सुफळच देतात. ''जे पेरले तेच परत उगवले'' ह्या कर्मगतिप्रमाणे दुवा देणारा मोबदल्यात दुवाच प्राप्त करतो. जसं एखाद्या मंदिराच्या घुमटातून ध्वनी परत येतो तसच दुवा दिल्या तर दुवा व बददुवा दिल्या तर परत बददुवाच पदरी पडतात. विघ्न विनाशक स्थितीसाठी अपकारीवर ही उपकार करणे, त्यास क्षमा करणे व त्याचे मनःपूर्वक हितचिंतक बनून त्याच्या विषयी शुभचिंतन करणे आवश्यक आहे. त्यामुळे आपोआपच आपापसातील वैर-वैमनस्य कायमचे संपते.

**८) श्रीगणेशाच्या हातात असलेले मोदक वा लाडू –** हे ''मधुरतेने दुसऱ्यांची मनं कशी जिंकावी'' जणू हीच कला शिकवतात. जिथे कटू वचन काट्याचे काम करतात. तिथे मधुर वचन मधाचा गोडवा देऊन, तुटलेल्या मनांना व अंतःकरणांना एक करते. शत्रूला ही मित्र बनविण्याची शक्ती मधुरतेच्या गुणातच आहे. मधुर भाषी व्यक्ती एखादी मनाला न पटणारी व बुद्धीला न पचणारी गोष्ट, गोड शब्दांमध्ये युक्तीने सांगून परक्याला ही आपलं बनवतो. तोंडात साखर असेल तर जग जिंकता येतं. मात्र कडू कार्ल्यासारखे बोल दुसऱ्याच्या मनाला तोडतात.

**९) श्रीगणेशाचे वाहन उंदीर –** हे गोंधळात टाकणाऱ्या समस्या, अचानक ओढवणारे संकट, विघ्न वा लंपडाव खेळणाऱ्या विघ्नसंतोषी व्यक्तींचे प्रतीक आहे. उंदीर दिसायला जरी छोटा असला तरी अचानक येतो नि पटकन लपतो मात्र पकडता येत नाही. उंदीर लपून छपून अन्न-धान्याची नासधुस ही करतो. त्याचप्रकारे झोपलेल्या व्यक्तीचे पाय फुंकून फुंकून कुरतडतो, पण पत्ता लागू देत नाही. जागे झाल्यावर रक्त दिसताच उंदराचा पराक्रम कळतो. असच समस्या ही छोटी जरी असली तरी व्यक्तीच्या तनामनाची नासधूस करते व अचानक अजाणतेपणे आलेले विघ्न, व्यक्तीचा समय, शक्ती व संपत्तीचा नाश करते. परंतु बुद्धिवान व्यक्ती समस्येला बुद्धीच्या बळावर स्व नियंत्रणाने वश करतो.

प्रगती पथावर वाट अडवू पाहणारे विघ्न खरे तर गुण शक्तींची कमतरता किंवा व्यक्तिगत व सामुहिक कमी कमजोरीच असते. व्यक्ती किंवा समाज जर ज्ञानी-गुणी, स्थूल व सूक्ष्म शक्तींनी सशक्त व समर्थ असेल तर किती ही मोठे विघ्न अथवा धर्मसंकट उभं राहिल तरी ते बुद्धिबळाने म्हणजे युक्तीने नाश करता येते. म्हटले ही जाते, 'शक्ती पेक्षा युक्ती श्रेष्ठ.' बाहुबलाने जिथे शत्रूला जिंकणे शक्य नसते, तिथे केवळ बुद्धीच्या बळावर विजय मिळू शकतो. त्यातच बुद्धी दिव्य-प्रगल्भ-विशाल-दूरदर्शी असेल तर विघ्नरूपी दुसऱ्याच्या काटा कायमचा उपटून काढून त्यास सदासर्वदा साठी भस्मीभूत करणे ही शक्य होते.

वर्तमान जग जणू समस्यांचा सागरच होय. एक समस्या संपली तर दुसरे विघ्न आलेच समजा. ते टळले

पान क्र. २८ वर



# मर्यादायुक्त जीवन हाच पुरुषोत्तम बनण्याचा आधार

ब्र. कु. बालूभाई, शांतिवन, (आबूरोड)

वास्तविक मर्यादेचा अर्थ आहे आपल्या प्रचलित व्यवहारात संस्कृतीची जोपासना करण्यासाठी काही नियम, मर्यादा वा सीमा निर्धारित करणे तसेच त्यानुसार मनावर नियंत्रण ठेऊन, स्वतःच्या कर्मेंद्रियांवर अनुशासन ठेवणे व जीवनात संतुलन प्रस्थापित करणे म्हणजे मर्यादांवर चालणे होय.

**मानवी जीवन हे बहुमूल्य व हिरेतुल्य आहे. मनुष्याने आपल्या बुद्धिमत्तेचा प्रयोग चांगले काय आणि वाईट काय हे नीट तपासून, जर चांगल्या मार्गाचा अवलंब केला तर निश्चितच तो देवतुल्य बनू शकतो.** तात्पर्य म्हणजे मर्यादायुक्त जीवन हाच पुरुषोत्तम बनण्याचा आधार आहे. म्हणूनच मर्यादा पुरुषोत्तम रामाच्याविषयी गायन केले जाते, **'रघुकुल रीत सदा चली आयी, प्राण जाये पर वचन न जाये ।'** कारण रामायणात रामाचे जीवन मर्यादा संपन्न व आदर्श दर्शविण्यात आले आहे.

**मर्यादेचे महत्त्व :**

बहुतांश लोकांना वाटते की मर्यादा एक बंधन आहे आणि त्या बंधनात राहून आपण यशस्वी होणे शक्य नाही. म्हणून ते मर्यादा तोडण्यास घाबरत नाहीत. उदा. रस्त्याने जातांना वाहतुकीचे नियम वा मर्यादा आपण पाळली नाही तर परिणामी दंड किंवा पश्चाताप होतो. तरी बरेच जण ट्रफिक पोलिस सिग्नलवर नसेल तर रेड लाईट असूनही, रोड क्रॉस करून, पुढे जातात. परंतु त्यावेळी मर्यादेचे उल्लंघन केल्याची भीती मनात कुठेतरी नक्कीच असते. अशाप्रकारे वर्तन टाळण्यासाठी मनरूपी पहारेकरी जर सदैव जागृत असेल तर कोणतेही कर्मेंद्रिय मर्यादा उल्लंघन करून, वाईट कर्म करणार नाही. परिणामतः आपले जीवन अतिशय सुखमय बनेल.

मर्यादेचे पालन केल्यामुळे संबंधात समता, समन्वय, सरळता व सन्मानाची भावना वृद्धींगत होते. मर्यादेत राहून एक नम्र व्यक्ती सुद्धा महान, श्रेष्ठ बनू शकतो. कारण नम्रचित्त व्यक्ती आपली सीमा वा मर्यादा जाणतो. त्यामुळे तो स्वतःच्या चुका कबूल करून, स्वयंप्रति व दुसऱ्याप्रति सत्यता आणि ईमानदारीचा परिचय देत असतो. त्याच्या या गुणामुळे तो प्रतिभाशाली व सन्माननीय बनतो.

**स्वयंप्रति मर्यादा :**

प्रत्येक व्यक्तीची स्वतःची अशी मर्यादा असते. ज्यावेळी त्याला पद, प्रतिष्ठा प्राप्त होते, त्यावेळी त्याला सामाजिक मर्यादेत रहावे लागते. उदा. राष्ट्रपतीला भेटण्यासाठी आपण सहजपणे जाऊ शकत नाही. त्यासाठी विशिष्ट नियम अथवा मर्यादेचे पालन करावेच लागते.

एखाद्या मंदिर, चर्च, मस्जिदमध्ये जाण्यापूर्वी बाहेर चप्पल वा बूट काढलेच पाहिजेत तसेच तेथील मर्यादांचे पालन करणे अनिवार्य असते. तशाच प्रकारच्या काही मर्यादा आपल्याही जीवनात असतात. त्यामुळे आपण सर्वच लोकांना संतुष्ट करू शकत नाही. **परंतु प्रत्येकाने दुसऱ्या व्यक्तीच्या मर्यादेचा स्वीकार करून, व्यवहार केला तर संबंधात सदृढता प्राप्त होईल. प्रत्येकाने दुसऱ्याची अडचण जाणून घेतली तर कुठलीच समस्या रहाणार नाही.**

**संबंधातील मर्यादा :**

विविध संबंधातील मर्यादा आपण जाणतो. जसे आई-वडिलांच्या सेवेचे ऋण फेडणे, हे मुलाचे कर्तव्य आहे. भावाने बहिणीविषयी सदैव कल्याणाची भावना बाळगणे. बहिणीने भावाबद्दल सुभर्चिंतक रहाणे. पति-पत्नीने एकमेकांना शेवटपर्यंत सहयोग देणे आपल्या मुलांचे नीट संगोपन करणे... या मर्यादा जाणल्यानंतर प्रत्येकाला याची

जाणीव होते की या सर्वच गोष्टी आपण नीटपणे करू शकत नाही. आपण स्वतः त्या यथाशक्ती पाळायच्या प्रयत्न केला तरी सर्व संबंधितांना संतुष्ट करता येत नाही. कारण प्रत्येकाचे विचार व अपेक्षा भिन्न असतात. यावर उत्तम उपाय म्हणजे सदैव मोठ्यांना सन्मान देणे व लहानांवर प्रेम करणे. आपली वाणी मधुर असेल तर संबंधात माधुर्य वा गोडवा टिकून रहातो. फलस्वरूप जीवन सुखमय प्रतीत होते.

**त्याचप्रमाणे परिवारातील मर्यादा, सामाजिक मर्यादा, कुळाची मर्यादा, सांस्कृतिक मर्यादा, धार्मिक मर्यादा, आध्यात्मिक जीवनाची मर्यादा या सर्वांचे पालन आपल्या जीवनाला सुशोभित व सुंदर बनवते.**

**मर्यादांचे उल्लंघन :**

मर्यादांचे उल्लंघन करण्यासाठी प्रामुख्याने एकच कारण असते. ते म्हणजे व्यक्ती आपल्या वाईट प्रवृत्तींना वेळीच आळा घालू शकत नाही. किंवा त्याची इच्छा नियंत्रणाबाहेर जाते. हीच इच्छा त्याला मर्यादा तोडण्यास कारणीभूत होते. ज्याचा परिणाम त्याला दुःख, पीडा, पश्चाताप इ. रूपाने भोगावा लागतो. उदा. द्रौपदीने वाणीची मर्यादा तोडली. परिणाम युद्ध आणि युद्धातून विनाशाचे फळ मिळाले. माता कैकयीने मोहापायी आपला पुत्र भरताला गादीवर बसविण्याची इच्छा राजा दशरथापुढे व्यक्त केली व रामाला १४ वर्षे वनवासात पाठवले. परिणामी पुत्रशोकाने राजा दशरथाचा मृत्यु झाला. श्रीरामाबरोबर श्रीसीता व लक्ष्मण हे देखील वनवासात गेले. वनवासाच्या काळात सीतेला कांचनमृगाच्या कातड्याची इच्छा झाली. श्रीराम व लक्ष्मण दोघेही त्या कांचनमृगाच्या मागे गेले असता, रावण तेथे ब्राह्मणाच्या वेशात आला व भिक्षा मागू लागला. त्याला भिक्षा देण्यासाठी सीतेने लक्ष्मण रेषेचे (अर्थात मर्यादेचे) उल्लंघन केले. त्याचा परिणाम म्हणजे रावणाने सीतेचे अपहरण केले व तिला शोक वाटीकेत डांबून ठेवले. तात्पर्य म्हणजे कुठलीही इच्छा ही मर्यादा तोडण्यास कारणीभूत ठरू शकते. मग ती इच्छा मनातील काम, क्रोध, लोभ, मोह, अहंकार, द्वेष, घृणा यापैकी कुणाविषयीही असू शकते. परंतु त्याचा परिणाम शेवटी नाश, सर्वनाश, वा सत्यानाश अशाच प्रकारचा असतो. तात्पर्य म्हणजे मर्यादायुक्त जीवन जगण्यासाठी क्षणिक सुखाच्या व अल्प प्राप्तीच्या इच्छांचा त्याग करणे आवश्यक आहे. अर्थात **'इच्छा मात्रम् अविद्या'** बनण्याची गरज आहे.

मर्यादेचे पालन करणारा व्यक्ती कर्माची गुहयगती समजून, त्रिकालदर्शी होऊन, मगच कर्म करतो. परिस्थिती विपरीत जरी असली तरी नैतिकतेच्या बळावर तो परिस्थितीला आपल्या अधीन करतो. म्हणूनच अशा व्यक्ती माननीय, वंदनीय, पूजनीय बनतात. आता आपण ब्राह्मणांच्या मर्यादा थोडक्यात समजून घेऊया.

**ब्राह्मण कुळाच्या मर्यादेचे पालन :**

आपले कुळ हे सर्वश्रेष्ठ ब्राह्मण कुळ आहे. ह्या कुळाचे नियम वा मर्यादा स्वयं शिव परमात्म्याने आपल्याला समजावून सांगितल्या आहेत. त्या सदैव आपल्या स्मृतीत असल्या पाहिजेत. मर्यादा पुरुषोत्तम ब्राह्मणांसाठी गायन आहे – **'धरत परिये पर धर्म न छोडिये ।'** संगमयुगात मर्यादाच पुरुषोत्तम बनवितात म्हणूनच मर्यादा पुरुषोत्तम असे म्हटले जाते. **ब्राह्मण जीवनात सर्वात मुख्य स्मृतीची मर्यादा आहे – 'मी एक श्रेष्ठ आत्मा आहे तसेच सर्वजण एक पिता परमात्म्याची मुले, श्रेष्ठ आत्मे आहेत' या मर्यादेचे पालन केले तर वृत्ती, दृष्टी व स्थिती स्वतःच श्रेष्ठ बनेल. त्याचबरोबर तमोगुणी मनुष्य आत्मे व तमोगुणी प्रकृतीच्या वायुमंडळ, वायब्रेशनपासून आपले संरक्षण होईल. तात्पर्य म्हणजे ईश्वरीय मर्यादांच्या बंधनात जो रहातो, तो मायेच्या सर्व बंधनातून मुक्त होतो.**

**संबंधांना जोडण्याचे काम करा :**

जसा सुईतील धागा जोडण्याचे काम करतो तसे आपणही संबंधांना स्नेहरूपी धाग्याने जोडले पाहिजे. हे पुण्याचे काम आहे. याउलट कातरीप्रमाणे कटु वचनांद्वारे संबंध तोडणे, हे पाप आहे. दुसऱ्याविषयी गैरसमज निर्माण करणे, वाईट विचार करणे, अफवा पसरविणे, ऐकीव गोष्टींवर विश्वास ठेऊन गैरव्यवहार करणे... या

पान क्र. ३० वर



# समस्त धर्मियांना मान्य होईल असा परमपिता परमात्म्याचा हृदयस्पर्शी परिचय (भाग – ३)

ब्र. कु. उज्ज्वलाताई, पुणे

बंधुनो, ह्या सौद्याच्या स्मृत्यर्थ केवळ शिवलिंगावरच धोतऱ्याचे विषारी फूल वाहण्याची परंपरा आहे. विषारी फूल अर्पण करणारे करोडो आत्मे असतील. परंतु विषसमान असलेले कामक्रोधादी विकार अर्पण करणारे अत्यल्प मनुष्य आत्मेच आहेत.

उद्धारकर्ता, ज्ञानसागर, ज्ञानसूर्य, त्रिकालज्ञानी, सत्यधर्म संस्थापक, स्वर्ग व त्या स्वर्गातील समस्त देवी-देवतांचा रचयिता ही सर्वोच्च विशेषणे केवळ त्या सद्‌गुरू परमात्म्याचीच आहेत. परमात्म्याला भाग्यविधाताही म्हटले जाते. अर्थात मनुष्यात्म्यांचे श्रेष्ठ भाग्य निर्माण व्हावे म्हणून तो श्रेष्ठ कर्मांचेही ज्ञान देतो. **२१ जन्मांच्या दैवी भाग्यासाठी भाग्यविधात्याचे महावाक्य आहे की, 'भाग्य की रेखा खींचनेका कलम आपके हाथमे है, जितनी चाहो उतनी लंबी रेखा आप खींच सकते हैं।' त्याचबरोबर त्याचे दुसरे महावाक्य आहे की, 'अभी नही तो कभी नही, अभी नही तो कल्प-कल्प भी नही।'** अशा प्रकारे सांप्रत समयाची जाणीव ठेऊन आपणा सर्वांना आपल्याच पारलौकिक पित्याचे ज्ञान जीवनात धारण करावयाचे आहे. त्याच बरोबर आत्मकल्याण व विश्वकल्याणही साधावयाचे आहे.

**बंधुनो, विनाशी प्राप्तीसाठी आपण दिवसातील दहा बारा तास व्यतित करतो. ही विनाशी प्राप्ती काही मृत्युनंतर तुमच्या आमच्या सोबत येणार नाही. आपल्या सर्वांच्या बरोबर येणार आहे ती पुण्यकर्मांची अविनाशी व अलौकिक प्राप्ती. जी प्राप्ती आपणास परमात्मा अत्यल्प काळात करवून देत आहे.** त्यासाठी आपणास ईश्वरीय ज्ञानाचा पाठ्यक्रम पूर्ण करुन आत्म्याच्या ज्ञानस्नानासाठी एक तास देणे आवश्यक आहे. आरंभी आठवड्यातून एक दिवस येणारे जिज्ञासू आता प्रतिदिन ह्या विद्यालयात ज्ञानमुरली (परमात्म्याची महावाक्ये) श्रवण करण्यासाठी नियमितपणे येत आहेत. तुमच्या आंतर्आत्म्यातील बुद्धिरूपी न्यायाधीश कोणता निर्णय देतो ह्यावरच तुमचे २५०० वर्षांच्या शाश्वत व निर्विघ्न अशा सुखशांतीचे दैवी भाग्य निर्माण होणार आहे. ज्यावेळी आपण सद्‌गुरूद्वारा सद्‌गतीचे ज्ञान प्राप्त कराल त्यावेळी आंतर्आत्म्यातून हाच आवाज येईल की, 'ज्ञान अंजन सद्‌गुरू दिया, अज्ञान अंधःकार विनाश हुआ'। स्वतः ज्ञानसूर्य सद्‌गुरू परमात्मा ज्ञान देऊन अज्ञानाबरोबरच मानवी मनातील अंधश्रद्धेची जळमटे नष्ट करीत असल्याने ब्रह्माकुमारी विद्यालय हे शंभर टक्के अंधश्रद्धा निर्मूलन करणारे विश्वातील एकमेव आध्यात्मिक केंद्र आहे.

बंधुनो, ज्यावेळी हे समजते की, मी कोण आहे? परमात्मा कोण आहे? तसेच देवात्मा व परमात्मा ह्यातील भेद स्पष्ट होऊन, भारताचा परिपूर्ण इतिहासही स्पष्ट होतो त्यावेळी अंधश्रद्धा अंशमात्रही रहात नाही. अशा प्रकारे अज्ञानाबरोबच मानवी मनातील अंधश्रद्धा दूर करुन, परमात्मा अंधश्रद्धा रहित अशा श्रेष्ठ युगाच्या स्थापनेचे महान कार्य करीत आहे. सदरहू कार्यात सहयोग देण्याची सुवर्णसंधी सर्वांनाच आहे. ह्या सुवर्णसंधीचा लाभ घेणाऱ्या मनुष्यात्म्याचे जन्मजन्मांतराचे कल्याण होईल. असे प्रदीर्घ कालासाठी आत्मकल्याण व्हावे, असे वाटत असेल तर आत्म्याचे अकल्याण करणाऱ्या पाच मनोविकारांचा त्याग करणे आवश्यक आहे. अर्थात तुम्हाला तुमच्या परिवाराचा मित्र संबंधियांचा अथवा वैभवाचा त्याग करण्याची आवश्यकता नाही. तुम्ही एखाद्या उच्च निवासस्थानात राहू शकता, शाही कारमध्ये फिरू

शकता, उत्तमोत्तम सात्विक पदार्थ ग्रहण करु शकता परंतु व्यसनांच्या व मनोविकारांच्या अधीन होणे, परमात्माला पसंत नाही. **बंधुनो, ज्या कामविकाराने विश्वात अनेक समस्या निर्माण केल्या आहेत त्या कामविकाराचा त्याग अल्पकाळा-साठी आपण करु शकत नाही काय? खरे तर आत्म्यांचा स्वधर्मच पवित्रता असल्याने ह्या विकारी कर्मानंतर विवेकी मनुष्याच्या आंतर्आत्म्यातून हाच आवाज येतो की, 'कुछ तो गलत हो रहा है।'** ह्या गलत अर्थात चुकीच्या कर्माला तिलांजली देऊन जीवनात पवित्रता धारण करणे; ह्याच एका मुख्य सहयोगाची त्या पारलौकिक पित्याला तुमच्या कडून अपेक्षा आहे. मनुष्य जन्म अन्य प्राण्यापेक्षा श्रेष्ठ मानला जातो. अन्य प्राण्यांसाठी धर्म, पवित्रता, चारित्र्यसंपन्नता इत्यादि नितीमूल्ये नसतात. नितिमूल्ये असतात ती मनुष्यासाठी! म्हणून त्याने आपल्या जीवनांत पवित्रता व चारित्र्यसंपन्नता धारण करणे आवश्यक आहे. हाच उच्चप्रतीचा मानव धर्म आहे! **वास्तविक जगातील सर्व स्त्री-पुरुष हे ब्रह्माकुमार व ब्रह्माकुमारीच आहेत. म्हणून ब्रह्माबाबांच्या प्रमाणे संपूर्ण पवित्र बनणे हे आपल्या सर्वांचेच कर्तव्य आहे. ह्या परमकर्तव्याला जो मनुष्य जाणतो तोच समर्पण बुद्धीने परमात्म्याला सहयोग देतो.** बंधुनो, निमित्त बनून विश्वाचा उद्धार करावयाचा असेल तर योगी बनणे आवश्यक आहे. भोगी कधीही विश्वाचा उद्धार करू शकत नाहीत.

सहयोगाचे हे कार्य आपल्याला अंतिम श्वासापर्यंत करावयाचे आहे. हे कार्य करणे अर्थात उलटया दिशेने वाहणाऱ्या कलियुगी संस्कृतीच्या असत्य प्रवाहाविरुद्ध जाणे होय! जो ह्या प्रवाहाविरूद्ध जाण्याचा प्रयास करतो तोच खरा सत्यवादी महावीर मनुष्यात्मा आहे. उलटया दिशेने वाहणाऱ्या प्रवाहाला सुलटी दिशा देणे हे तर आपल्या सर्वांचे परमकर्तव्य आहे. ज्याप्रमाणे पाण्याच्या प्रवाहाला उलटी दिशा देताना त्याचा खळखळाट होतो तद्वतच ह्या असुरी संस्कृतीचा पतित प्रवाह, पावन दैवी संस्कृतीच्या दिशेकडे वळविताना विरोधांचा, मतमतांतराचा व अनेक समस्यांचा खळबळाट तर होणारच आहे. ह्या दुर्गम कार्यात परमात्मा आपला साथीदार आहे. तो अकर्ता असला तरी 'करनकरावनहार' मात्र निश्चित आहे. युग परिवर्तनाचे कार्य तो आपल्या आत्मिक पुत्रांच्या द्वारे करवून घेत आहे. कलियुगात अनेक संत-महात्मे होऊन गेले. ज्यांचा स्वतः परमात्म्याने 'भारताचे आधार स्तंभ' म्हणून गौरव केला आहे. अशा गौरवशाली संतांनी आत्मिक पतन रोखण्याचे सामाजिक कार्य अवश्य केले आहे. परंतु कोणीही हे सांगितले नाही की कलियुग अल्पावधीत समाप्त होऊन, देवी देवतांचे सत्ययुग येणार आहे. विद्वान पंडितांनी तर कलियुग समाप्त होण्यास हजारो वर्षे बाकी आहेत असे सांगून, मनुष्य आत्म्यांना अज्ञान अंधःकारात निद्रिस्त केले आहे. ह्या निद्रेतून जागे करण्यासाठी परमात्म निर्मित अनेकानेक ज्ञानगंगा अर्थात ब्रह्माकुमारी ज्ञान अमृताचे सिंचन मनुष्यात्म्यांच्यावर करीत आहेत. बंधुनो, त्या गंगा नदीत स्नान केल्याने मनुष्यात्मा पावन होणार नाही. परंतु चैतन्य ज्ञान गंगाद्वारे होणाऱ्या ज्ञानजलाच्या सिंचनाने पावन बनण्याच्या प्रक्रियेला आरंभ मात्र होईल. पाच तत्वांसहित सर्व मनुष्यात्म्यांना पावन बनवून, कनिष्ठ युगाचे परिवर्तन सर्वश्रेष्ठ अशा सत्ययुगात करणे हे कार्य केवळ परमात्म्याचेच असल्याने त्यालाच 'युगपरिवर्तक' ही उपाधी देणे यथायोग्य होईल.

पतितपावन परमात्म्याचे आत्म्यांना पावन बनविण्याचे अवतरण कार्य समाप्त झाल्यानंतर ह्या पतित कलियुगी तमोप्रधान मनुष्यसृष्टीचा महाविनाश झाल्या शिवाय सत्ययुगाची नवनिर्मिती होणे असंभव आहे. ह्या महाविनाशात बहुतांश मनुष्यात्मे आपली देहवस्त्रे त्यागून आकाश तत्वाच्या पार असलेल्या मुक्तिधामी मुक्तीच्या अवस्थेत जातात. त्यासाठी परमात्म्याचे महावाक्य आहे की, 'मी अवतरित झालो आहे तुम्हा सर्व आत्म्यांना पुनः मुक्तिधामी घेवून जाण्यासाठी'! ह्या पृथ्वी रंगमंचावरील चार युगांचे हे महानाट्य पूर्ण होत आले आहे. प्रत्येक

मनुष्यात्म्याने आपल्या भिन्न-भिन्न भूमिका यथार्थतः बजाविल्या आहेत. मुक्तिधामातील तुमचा (ब्रह्मा-वत्सांच्या आत्म्यांचा) समय पूर्ण झाल्यानंतर सत्ययुगी स्वर्गात पुन: तुम्हाला तुमच्या पहिल्या दैवी जन्माची भूमिका बजवायची आहे.' परमात्मा मात्र ह्या स्वर्गात कदापी येत नाही. परमात्म्याची विशेषता हीच आहे की, तो स्वर्गाचा रचयिता असूनही त्या स्वर्गाचा उपभोग अंशमात्रही घेत नाही अर्थात स्वर्ग स्थापनेचे कार्य संपन्न होताच तो आपल्या परमधामी वानप्रस्थ स्थितीत स्थित होतो, म्हणूनच त्याला अभोक्ता व महात्यागी म्हटले आहे. स्वर्गाचा सात्विक आनंद, सुख व सुवर्ण वैभव मनुष्यात्मे देवता रुपातच उपभोगतात.

बंधुनो, चार युगांच्या चक्रात प्रत्येक ५००० वर्षांनी सत्ययुग निर्माण होणे अपरिहार्य आहे अर्थात सत्ययुग ही काही कल्पना नव्हे. ते तर अटल सत्य आहे. ज्याच्या नावातच सत्य आहे ते असत्य असेल काय? त्या सत्याचे प्रतीक आहे आपल्याच देवघरातील इष्ट देवी देवतांच्या पूजनीय मूर्ती. तसेच भारतात असलेली देवी देवतांची लक्षावधी मंदिरे! ह्या मंदिरात आपण राधे-कृष्णाच्या जड मूर्ती अवश्य पाहिल्या असतील. परंतु आपणास चैतन्यामध्ये श्री राधेकृष्ण व त्याच बरोबर भारताचे सर्वोच्च सुवर्ण वैभव पहावयाचे असेल तर सत्ययुगी देवत्व पद प्राप्त करण्याचा पुरुषार्थ करणे अत्यावश्यक आहे. त्यासाठी ह्या पुरुषोत्तम संगमयुगावर संपूर्ण निर्विकारी बनून, परमात्म ज्ञानाचा अमूल्य खजाना बुद्धिरूपी खोऱ्याने लुटावयाचा आहे. कारण पित्याच्या संपत्तीवर पुत्रांचा हक्क अवश्य असतोच. हाच ज्ञान खजाना आपणास सत्ययुगी स्वर्गात रत्नजडित सुवर्ण मुगुट व सुवर्ण महाल प्राप्त करून देईल. असे हे सत्ययुगी दैवी भाग्य प्राप्त करण्यासाठी आपल्या सर्वांना परमात्म रचित ज्ञान यज्ञाची तन, मन व धनाने शक्य होईल तितकी सेवा करावयाची आहे. यज्ञसेवा कशी केली जाते हे पहावयाचे असेल तर आबू पर्वताजवळील आमच्या नव्हे तर आपल्या मुख्य सेवाकेंद्रावर दोन-तीन दिवस अवश्य मुक्काम करावा.

**बंधुनो, सर्वात पुण्य कर्माची सेवा आहे, संपर्कात येणाऱ्या सर्व मनुष्यात्म्यांना नव विश्व रचयिता परमात्म्याचा व त्याच्या महान कार्याचा परिचय करून देणे. हा अल्पसा परिचय अमृतकुंभाद्वारे वाचकांना प्राप्त होईलच. वाचकांनीही केवळ हाच अमृतकुंभ नव्हे तर प्रत्येक अमृतकुंभ आपल्या मित्र संबंधियांना देण्याची सेवा अवश्य करावी. ही अत्यावश्यक सेवा ह्या साठीच आहे की, परमात्म अवतरणाचा संदेश सर्व धर्मांतील सर्व आत्म्यांना प्राप्त होऊन, प्रत्येक मनुष्यात्माचा त्याच्याशी असलेला संबंध यथार्थतः जोडला जावा.** बंधुनो, ज्याप्रमाणे पॉवर हाऊसशी घरातील वायरचा संबंध नसेल तर घरात वीज येऊ शकत नाही. तद्वतच त्या शांतिसागर व शक्तिसागर परमात्म्याशी मन-बुद्धिची तार जोडली गेली नसल्याने आजचा मनुष्य अशांत व आत्मिक दृष्ट्या निर्बल झाला आहे. ती तार जोडली जाऊन त्याला सुखशांती प्राप्त व्हावी म्हणून शांतिसागर परमात्म्याचा परिचय व त्याच्या अवतरणाचा संदेश देण्याची सेवा आपणा सर्वांनाच करावयाची आहे. ही सेवा करीत असताना परमात्म्याविषयी समर्पण भाव असणे आवश्यक आहे. पारलौकिक पित्या विषयी जितकी समर्पणता तितकी अलौकिक भाग्याची रेषा अधिक उच्च व अधिक सुस्पष्ट होईल.

**बंधुनो, असे अलौकिक भाग्य घडविण्यासाठी समय फारच थोडा राहिला आहे. कारण गेल्या ८१ वर्षांत परमात्म्याने भगवद्गीतेचे अठरा अध्याय जवळ-जवळ पूर्ण केले आहेत. आता तो केवळ सर्वांच्या निरोपार्थ महावाक्य उच्चारित आहे.** ही महावाक्ये श्रवण करताना आंतर्आत्म्यातून हाच आवाज येतो की, आता आत्मा व परमात्म्याची परमधामी प्रस्थान करण्याची वेळ समीप आली आहे. बंधुनो, ज्ञानगंगा ही उपाधी परमात्म्याने लक्षावधी ब्रह्माकुमारींना दिली आहे. त्याचे प्रतीक अथवा यादगार आहे शिवमंदिराबाहेर अभिषेकाचे तीर्थ प्रवाहित करण्यासाठी असलेले गोमुख! वर्तमान समयी आपणा

सर्वांनाच चैतन्य गोमुखातून आलेले ज्ञानाचे तीर्थ अथवा ज्ञानामृत प्राशन करावयाचे आहे. ह्या अमृतसागरातील हे अमृत प्राशन केल्यास 'तेरी एक बूँद के प्यासे हम' असे म्हणण्याची वेळ मानवमात्रावर येणारच नाही. ह्या ज्ञानामृतामुळे आपले अमरत्व कोणत्या संकल्पनेत आहे ह्याचीही जाणीव होईल. अर्थात त्या संकल्पनेचे तरंग वारंवार मनात येऊ लागले की, बुद्धीचा हा निर्णय होईल की, 'मी माझ्या पारलौकिक पित्या प्रमाणेच अमर आहे.' मज आत्म्याला केवळ देहवस्त्र धारण करण्याचा व देहवस्त्र त्यागण्याचा खेळ करावयाचा आहे. बंधुनो, हा सृष्टीतीत खेळ आपण सर्व मनुष्यात्मे करीत आलो आहोत व हा खेळ न करणारा केवळ तो एकमात्र परमात्माच आहे. त्याने दिलेल्या ज्ञानामृतामुळे आपल्या अमरत्वाची जाणीव होऊन देहाभिमान आपोआपच नष्ट होईल. अर्थात आत्माभिमानामुळे मानवी जीवनाचा सर्वोदय होऊन, तुमचे, आमचे व समस्त विश्वाचे प्रदीर्घ काळासाठी कल्याण होईल. असे हे कल्याण साध्य करण्यासाठी अज्ञान निद्रेतून जागृत होण्याची आवश्यकता आहे. त्यासाठी एका स्फूर्ती गीताच्या एका ओळीतील एका शब्दाचा बदल करून अहिंसक राष्ट्रवीरांसाठी ती ओळ येणे प्रमाणे म्हणावी वाटते की, 'उठा चला राष्ट्रवीर हो, सज्ज व्हा उठा चला, निःशस्त्र व्हा उठा चला, उठा राष्ट्रवीर हो! (सशस्त्र ऐवजी निःशस्त्र) असुरी रावणराज्याचा बिमोड व दैवी रामराज्याची पुनर्स्थापना करणे ही क्रांति कोणत्याही शस्त्राशिवाय अर्थात पूर्णतः अहिंसक पद्धतीने होत असल्याने, आपल्या सर्वांना निःशस्त्र होऊनच ही क्रांति करावयाची आहे. त्या दृष्टीने एका ईश्वरीय गीतातील दोन-तीन ओळी सदरहू क्रांतिकारक विचारांना पूरक आहेत. त्या ओळी येणे प्रमाणे -

**शांति का आयेगा जब सवेरा,**
**दूर हो जायेगा सब अँधेरा ।।**
**आपसी प्यास इतना बढेगा,**
**कोई भी देश फिर ना लडेगा ।।**
**जग से उठेगा शस्त्रों का ढेरा,**
**..दूर हो जायेगा सब अँधेरा ।।**

बंधुनो, केवळ भारताचेच नव्हे तर संपूर्ण जगाचे तबबल २५०० वर्षांकरिता निःशस्त्रीकरण होऊन अहिंसा परमोधर्माचे पालन केले जाते ह्याची कल्पना हे हिंसक जग करु शकेल काय? त्या संपूर्ण अहिंसक जगतात आपल्यासाठी निर्विघ्न व अपार सुखशांती असेल अशी ही सुखशांतीयुक्त दोन दैवी युगे निर्माण करणाऱ्या परमात्म्याची मात्र दैवी मानवाला विस्मृती होते. ह्या विस्मृतीबरोबरच त्याचा यथार्थ परिचयही पूर्णतः लोप पावतो. तो परिचय पुनः प्रत्येक कल्पात केवळ पुरुषोत्तम संगमयुगावरच, प्रत्येक ५००० वर्षांनी मनुष्यात्म्यांना प्राप्त होतो. परमात्म्याच्या परिचयाबरोबरच अवतरणाचा संदेश सर्व धर्मातील सर्व आत्म्यांना देण्याचा उद्देश हाच आहे की, अंतिम समयी परमात्म्याच्या प्रत्यक्षतेनंतर कोणाच्या ही मुखी हा दुःखोद्गार येऊ नये की, 'मला माझ्या परमपित्याचा, अल्लाहाचा अथवा गॉडफादरच्या अवतरणाचा संदेश प्राप्त झालाच नाही!' जे मनुष्यआत्मे परमात्म वतरणाचा संदेश श्रवण करून ईश्वरीय ज्ञानही प्राप्त करतील त्यांच्या बुद्धीचा हा निर्णय होईल की, 'मज आत्म्याचा पिता परमात्मा अवतरित झाला आहे. मजला पावन बनवून जन्मजन्मांतराचे कल्याण करण्यासाठी! अर्थात ह्या निर्णयानुसार जे मनुष्य-आत्मे स्वकल्याण व विश्वकल्याण करण्याचा पुरुषार्थ करतील तेच भविष्यात निर्माण होणाऱ्या दैवी विश्वावर राज्य करतील. भविष्यात असे राज्य करणारे मनुष्यआत्मेच वर्तमान समयी परमात्म्याच्याही हृदयसिंहासनावर राज्य करतील. **माझ्या वैश्विक बंधुनो, असे दुहेरी परमभाग्य आपणास प्राप्त करावयाचे असेल तर त्यासाठी प्रथमतः आत्म्याची ज्ञानयुक्त, योगयुक्त व पवित्रता संपन्न स्थिति प्राप्त करावी. अर्थात त्यासाठी ब्रह्माकुमारी विद्यालयात येणे अनिवार्य आहे.**

***

**आपली स्थिती एकरस रहाण्यासाठी सदैव लक्षात ठेवा की 'एक बाप दुसरा कोणी नाही.' एक शिवबाबांमध्ये लवलीन रहा. त्याच्या आठवणीत सामावून जा.**



# आरोग्यम् धनसंपदा

## (तन-मनाच्या आरोग्यात आपल्या संकल्पांचा प्रभाव)

**ब्र. कु. भगवान भाई , शांतिवन (आबू रोड)**

**ज्ञानसागर शिवबाबांनी हे समजावून सांगितले आहे की अनेक जन्मांतील विकर्मांच्या फलस्वरूप तन-मनाच्या व्याधी येणे स्वाभाविक आहे. त्यातून मुक्त होण्यासाठी वैद्यराज (सुप्रीम सर्जन) शिवबाबांनी सहज उपचारही सांगितले आहेत.**

१) सर्व प्रकारच्या तन-मनाच्या व्याधीपासून मुक्त होण्यासाठी अतिशय सहज उपाय आहे, **देहापासून अलिप्त (न्यारे) आपल्या मूळ आत्मिक स्वरूपात स्थित होणे कारण आत्मिक स्वरूप सर्व व्याधींपासून मुक्त आहे.** परंतु जेव्हा कर्मभोगाच्या वा व्याधींच्या वेदना होत नाहीत, त्यावेळी देहापासून अलिप्त (न्यारे) बनण्याचा अभ्यास करणे, आवश्यक आहे. हा अभ्यास असेल तर कर्मभोगाच्या वेळी होणाऱ्या वेदना जाणवणार नाहीत.

२) वास्तविक आपल्याला होणारी तन-मनाची व्याधी व त्यामुळे होणाऱ्या वेदना याला मूळ कारण अनेक आत्म्यांबरोबर असलेले आपले हिसाब-किताब (कर्माचा लेखा-जोखा) आहेत. यातून मुक्त झाल्यानेच व्याधींपासून आपली मुक्तता होते. त्यासाठी आपल्या **आत्मिक स्वरूपात स्थित होऊन, सर्व आत्म्यांना शुभभावना, शुभ-कामनांचे वायब्रेशन्स देणे, हा एक सफल उपचार आहे.** शिवबाबांनी हे ही सांगितले आहे की कर्मभोग आपल्याच कर्माचे फळ आहे आणि आपल्यालाच त्यातून मुक्त व्हायचे आहे. हे सत्य ज्ञान जेव्हा बुद्धीत असेल तेव्हा कर्मभोगाची वेदना कमी जाणवेल. परंतु कर्मभोगासाठी आपण जेव्हा दुसऱ्यांना कारण समजतो तेव्हा थोडासा कर्मभोग सुद्धा मोठा जाणवतो.

३) आपल्या तन-मनाच्या आरोग्यात आपल्या मनाच्या संकल्पांचा व आपल्या स्थितीचा महत्त्वपूर्ण प्रभाव पडतो. **जसे आपले संकल्प असतील त्यानुसार शरीराच्या ग्रंथीतून रस स्त्रावित होतात, जे आपल्या दैहिक स्वास्थ्यासाठी कारण बनतात.** जेव्हा मनुष्य भय-चिंता, राग-द्वेष, ईर्ष्या-घृणा, दुःख-अशांती, काम-वासना इत्यादींमुळे ग्रसित होतो, त्यावेळी जे रस स्त्रवित होतात, ते अनेक रोगांचे कारण बनतात. याउलट **जेव्हा मनुष्य विश्व नाटकाचे यथार्थ ज्ञान, प्रभु-स्मृती, योग-साधना याद्वारे आत्मिक शक्तीने संपन्न होतो तेव्हा तो निर्भय-निश्चिंत, शांती, पवित्रता, आत्मिक प्रेम इत्यादींनी भरपूर होतो. त्यावेळी त्याच्या शरीरातील ग्रंथींपासून जो रस स्त्रवित होतो, त्याद्वारे अनेक रोग बरे होतात.**

४) शरीर अस्वस्थ (रोगी) असेल तर त्याचा प्रभाव मनाच्या स्वास्थ्यावर पडता कामा नये. **मन सदैव खुशीत नाचत राहिले तर शरीर देखील ठीक होईल. मनाच्या खुशीने शरीराला चालवा. शरीर स्वास्थ्यासाठी आशीर्वाद (दुवा) व औषध (दवा) या दोघांचा प्रयोग करा.** औषधे ही कलियुगी सीझनची फळे समजून घ्या. आजाराला कधीही घाबरू नका. आजारी पडलात तर औषधरूपी थोडी फळे खा व आजाराला निरोप द्या.

५) ज्याप्रमाणे संगमयुगातील या एका जन्माच्या श्रेष्ठ पुरुषार्थाचे फळ आपल्याला अनेक जन्मात प्राप्त होते त्याप्रमाणे मागील अनेक जन्मातील विकर्मांचे खाते या एका जन्मात फेडावे लागते. त्यामुळे मागील अनेक जन्मांचा हिशोब या एका जन्मात फेडायचा असल्याने केव्हा-केव्हा कर्मभोग मोठ्या फोर्सने येतो. अशावेळी जर आपण साक्षी होऊन पाहिले तर शारीरिक व्याधीचे रूप बदलून, तो एक खेळ अनुभवाला येतो.

**शारीरिक हिशोब (कर्मभोग) असतांनाही स्व–स्थिती जर चांगली असेल तर तो साधक स्वस्थ दिसतो. त्याच्या मुखावर, चेहऱ्यावर आजाराचे कुठलेही चिन्ह दिसून येत नाही. मम्मा–बाबांच्या जीवनात तसेच वरिष्ठ ब्रह्मावत्सांच्या जीवनात आपण ही गोष्ट प्रत्यक्ष पाहिली आहे.**

तात्पर्य म्हणजे कुठलाही आजार वा दुःख असेल तर शिवबाबांची आठवण (याद) हाच त्यावरचा रामबाण उपाय आहे. याचेच गायन केले जाते – **'सिमर–सिमर सुख पावो। कलह–क्लेष मिटे सब तनके, जीवनमुक्ति पावो।'**

६) **सदैव खुशीत रहा व दुसऱ्यांनाही खुशी प्रदान करा.** कधीही कसली चिंता करू नका. तन ही खुश, मन ही खुश तसेच धनही खुशीने कमवा व खुशीने कार्यात लावा. जेथे खुशी आहे तेथे दाळ-रोटी सुद्धा ३६ प्रकारच्या भोजनाचा अनुभव करवते. त्याचबरोबर जेथे खुशी आहे तेथे १०० रुपये सुद्धा हजारो रुपयांच्या समान आहेत. त्यामुळे सदैव हे वरदान लक्षात ठेवा की, आपण शिवबाबांची मुले सदा खुशीत रहाणारी आहोत. सर्वात मोठे सावकार आहोत. कारण आपल्या जवळ खरे धन (ज्ञान) आहे. लोकांजवळ विनाशी धन आज आहे, उद्या नसेल. परंतु अविनाशी धन आपल्याजवळ आहे.

**सर्वात महत्त्वाची गोष्ट म्हणजे आपण मास्टर सर्वशक्तिवान आत्मे आहोत, विजयी रत्न आहोत कारण शिवबाबा आपल्या सोबत आहे. त्यामुळे आपल्यावर माया, व्यक्ती वा प्रकृती यांच्याद्वारे आलेल्या विघ्नांचा प्रभाव पडू शकत नाही. आपला विजय निश्चित आहे. त्यामुळे सदैव अतींद्रिय सुखाचा अनुभव घेत रहा. याचेच गायन आहे –**

**अतींद्रिय सुखवाला, तेरी गोद में झुला है।**

**जो बैठा गोद तेरी, वो हर दुःख भुला है।**

***

---

पान क्र. २० वरून

तर तिसरा विघ्न संतोषी पहाडासारखा वाटेत आडवा झालाच समजा... जणू जीवन-सागरात विघ्नांच्या नाना लाटा एकामागून एक उठताना दिसतात. व्यक्ती जर त्या विघ्नरूपी लाटांना पाहात बसला तर त्याला एक पाऊल पुढे टाकणे ही अति कठीण होईल. पण विघ्नांना घाबरून हातावर हात धरून बसलो तर पदरी फक्त अपयशच पडू शकते. म्हणून जर समस्यांच्या समाधानावर विचार केला, विघ्नाची कशी विल्हेवाट करता येईल, ह्यावर मन-बुद्धीस एकाग्र केले व वर वर्णिलेल्या श्रींच्या मंगलमूर्तीत लपलेले गुढ रहस्य ध्यानी मनी ठेवले तर सहजच विघ्नांचा विनाश होऊ शकेल.

त्यात ही नाना सद्गुणांची सोबत असेल, दिव्यबुद्धीबरोबर दिव्यगुणांचा सहयोग घेतला तर हिमालयासारखे संकटही सहज टळू शकते व जीवन निर्विघ्न होऊ शकते. म्हणूनच म्हणू या गणपती बाप्पा मोरया... अन् विघ्न विनाशक स्थिती बनवूया...

***

**– परमात्मा शिव पिता किती निरहंकारी आहे. जर शिवबाबा आज्ञाधारक आहे तर आपण स्वतःला विचारा की मी किती निरहंकारी व नम्रचित्त आहे? जर सर्वश्रेष्ठ ॲथॉरिटी, स्वयं परमात्मा म्हणतो की मी तुमचा सेवक आहे तर आपण किती निरहंकारी असले पाहिजे. त्यासाठी स्वतःला ईश्वरीय सेवाधारी समजा म्हणजे आपल्यात निरहंकारीपणा येत जाईल.**

**– आदरणीय दादी प्रकाशमणीजी**

पान क्र. १५ वरून

रामायण लिहिले त्यात जे प्रसंग दाखविले ते भिन्न - भिन्न कां दर्शविले आहेत? जसे वाल्मिकी रामायण, तुलसीकृत रामचरित मानस, भवभूति रामायण तसेच आता एवढ्यात १०-१५ वर्षापूर्वी गुजराती लेखक श्री. दिनकर जोशी द्वारा लिखित रामायण. या सर्वांमध्ये वेगवेगळे प्रसंग दाखविले आहेत. जसे वाल्मिकी रामायणामध्ये सीता स्वयंवर दाखविले नाही आणि तुलसीदास रचित रामायणमध्ये ते दाखविले आहे. वाल्मिकी रामायणमध्ये लिहिले आहे की, जेव्हा पंचवटीमध्ये सीतेजवळ ब्राह्मणाच्या रुपात रावण जातो तेव्हा प्रथमच सीतेला पाहतो आणि त्यात अहिरावण व महिरावणाचा प्रसंग दाखविला नाही परंतु अन्य जे रामायण लिहिले गेले आहेत त्यात काही दुसरे प्रसंग दर्शविले आहेत आणि हा प्रसंग सांगितला नाही. तेव्हां मी एका पंडिताला विचारले की, वेगवेगळ्या रामायणातील काही प्रसंग वेगवेगळे का आहेत? ते म्हणाले की, रामायण तर तेच आहे परंतु समयानुसार प्रसंगांमध्ये परिवर्तन झाले आहे. हाच प्रश्न मी जेव्हा दुसऱ्या पंडिताला विचारला तेव्हा ते म्हणाले, सर्व काही सारखेच आहे परंतु ज्यांना जो प्रसंग जास्त अधिक आवश्यक वाटला, त्याला त्यांनी महत्व दिले. अन्य कुणाला तो प्रसंग जास्त प्रभावशाली वाटला नाही तो त्यांनी प्रभाविपणे लिहिला नाही. ज्याप्रकारे घरी भोजन बनले जाते पण त्यातील कुणाला काय आवडते, कुणाला काही आवडते. त्याप्रकारे रामायणाच्या लेखकांनी प्रसंगांचे विविध प्रकारे वर्णन केले आहे.

असेच एका पंडिताबरोबर माझे बोलणे झाले.तेव्हा ते म्हणाले की, ब्रह्माकुमारीवाले कसे काय म्हणतात की कलियुगाचा अंत जवळ आला आहे, जेव्हा शास्त्रामध्ये लिहिले आहे की, कलियुग अजून बाल्य अवस्थेत आहे.

तेव्हा मी त्या पंडिताला विचारले की, समजा मी जर तुम्हाला माझ्या वडिलांची आत्मकथा वाचायला दिली ज्यामध्ये लिहिले आहे की, रमेश आता ५ वर्षाचा मुलगा आहे आणि मी ही म्हणतो की तोच ५ वर्षाला मुलगा मी रमेश आहे. तर ती गोष्ट तुम्ही मानाल काय? तेव्हां पंडितजी म्हणाले की, मी हे मानू शकतो की, तुम्ही ५ वर्षाचे बालक असतांना ही आत्मकथा तुमच्या वडिलांनी लिहिलेली आहे. ही काल नाही लिहिली म्हणजे वर्तमान काळ आणि ज्या काळात लिहिली गेली त्यामध्ये इतका काळ गेला की तोपर्यंत आपण मोठे झालेलेच असणार. तेव्हा मी पंडितजींना विचारले असे किती ग्रंथांमधून लिहिले गेलेय की कलियुग अजून बाल्य अवस्थेत आहे? त्यांनी सांगितले की असे ८-१० ग्रंथामधून तरी लिहिलेले आहे. तेव्हा मी म्हणालो की, हे ग्रंथ जेव्हा लिहिले गेले तेव्हा कलियुग बाल्य अवस्थेत होते याचावर अर्थ असा नाही होत की, ही शास्त्रे काल लिहिली गेलीत आणि आपण आज वाचत आहोत. या ग्रंथांना जेव्हा लिहिण्यात आले आणि ते नंतर आपल्या वाचनात आले, त्यात काळाचे फार मोठे अंतर आले आहे; मग कसे काय म्हटले जाते की कलियुग बाल्य अवस्थेत आहे? आता बाल्य अवस्थेच्या बदल्यात कलियुग अवश्य तरुण किंवा वृद्ध अवस्थेला आले असणार ना?

मग मी दुसरा प्रश्न केला की, तुम्ही कसे काय म्हणू शकता की शास्त्र अनादि आहेत म्हणजे सृष्टीच्या सुरुवातीपासून आहेत? कारण जर मी तुम्हाला असे म्हटले की, माझे वडिल शाश्वत आहेत, अविनाशी आहेत तर तुम्ही मानाल काय? तेव्हा पंडित म्हणाले की, नाही मी कसा मानू शकणार? कारण आत्मकथेमध्ये लिहिलेले आहे कि रमेश जेव्हा ५ वर्षाचा होता तेव्हा आत्मकथा लिहिली गेली आहे म्हणून ती शाश्वत व अविनाशी नाही आहे. अशा प्रकारे शास्त्रांची रचना त्यावेळी झाली जेव्हा कलियुग बाल्य अवस्थेत होते. ब्रह्माकुमारीवाले म्हणतात की, सत्ययुग-त्रेतायुगमध्ये शास्त्रांची गरज नसते आणि द्वापरयुगाच्या सुरुवातीला भक्ती सुरु झाली आणि नंतर शास्त्र बनले गेले.

आपल्या हिशेबानुसार शास्त्र

कलियुगाच्या सुरुवातीला लिहिले गेलेत; परंतु ब्रह्माकुमारीज् अनुसार द्वापरयुगात शास्त्र लिहिले गेले तर मग कोणती गोष्ट सत्य आहे? शास्त्र द्वापरयुगात लिहिले गेले की कलियुगात लिहिले गेले?

आज मी या प्रश्नांचे वर्णन या लेखात यासाठी केले आहे की, यात स्पष्ट होत आहे की ड्रामा सत्य आहे आणि या ड्रामामध्ये आपली भूमिका सुद्धा अविनाशी आणि सत्य आहे. जसे अनेक वेळा या सृष्टीचे चक्र सदैव फिरत असते तसे सदा फिरत राहील. यासाठी मी मातेश्वरींना प्रश्न केला होता की, ड्रामा आतापर्यंत किती वेळा चक्रामध्ये फिरला असेल. त्यावर मातेश्वरीजींनी खुप छान उत्तर दिले की, मी जर असे म्हटले की, हे चक्र १८५ वेळा फिरले आहे आणि आता चक्राची १८६ वी वेळ आहे फिरण्याची! मग ड्रामाबद्दल जे म्हणतात की ड्रामाची तंतोतंत पुनरावृत्ती होते, ते असे म्हणू शकणार नाही. कारण या ड्रामाला कुणी संख्येच्या बंधनात बांधू शकणार नाही. कारण ड्रामा संख्येच्या बंधनाच्या पलिकडे आहे.

म्हणून मी विद्वान वाचकवर्गाच्या समोर शास्त्राच्या गोष्टी ठेवीत आहे. यावरुन आपण स्वतःच शास्त्रांच्या अशा गोष्टींवर विचार करून निर्णय करु शकाल की, ड्रामा सत्य की शास्त्रामध्ये लिहिल्याप्रमाणे ब्रह्म सत्य-जगत मिथ्या, हे खरं? जर सृष्टी मिथ्या आहे तर मग आपण ही सगळे मिथ्या आहोत. विचार करा की आपण सत्य आहोत की मिथ्या आहोत तसेच ज्या जगात आपण रहात आहोत, हे सृष्टीचक्र फिरत रहाते. काय हे सुध्दा मिथ्या आहे? मी शिवबाबांच्या ज्ञानाच्या आधारे हा लेख लिहिला आहे. काय सत्य आहे आणि काय मान्यता आहेत. या प्रश्नाचे उत्तर, तुम्हालाच द्यायचे आहे.

***

(क्रमशः)

---

पान क्र. २२ वरून

सर्व गोष्टी जर टाळल्या तर संबंधात दुरावा निर्माण होणार नाही. तसेच संबंधात स्नेह, सद्‌भावना, सन्मान... टिकून राहिल.

**आपल्या मर्यादा स्वतःच निर्धारित करा :**

जशी स्वतःची दिनचर्या आपण स्वतःच ठरवतो तशी मनाची दिनचर्या ठरवून, त्याचे व्यवस्थापन करणे हे देखील आपल्याच हातात आहे. कुणाची टिंगल करणे, टीका-टिप्पणी करणे, निंदा करणे, मजाक उडविणे, दुसऱ्याच्या कमजोरीचा फायदा घेणे, त्याच्या विफलतेवर हसणे... या सर्व गोष्टी नकारत्मक आहेत. त्यामुळे आत्म्याची बॅटरी डिसचार्ज होत जाते तसेच दुसऱ्याचेही नुकसान होते. म्हणून स्वतःला महान बनविण्यासाठी स्वतःच आपले नियम बनवा व त्यांचे पालन करण्याचा प्रयत्न करा.

**जीवनात संतुलनाला महत्त्व द्या :**

असे म्हटले जाते की, जेथे संतुलन (Balance) आहे तेथे ईश्वराचा कृपाप्रसाद (Blessing) अवश्य प्राप्त होतो. आपल्याला अगदी साधे भोजन जरी बनवायचे असेल तर त्यात सर्व गोष्टींचे संतुलन आवश्यक आहे तरच ते चविष्ट वा रुचकर लागते. थोडे मीठ जास्त झाले तरी चव बिघडून जाते. त्याचप्रमाणे ब्राह्मण जीवनात जे मुख्य चार विषय (ज्ञान, योग, धारणा व सेवा) आहेत; त्यांचे देखील संतुलन असणे आवश्यक आहे.

**ईश्वरीय ज्ञानाचे मंथन करून, ते जीवनात उतरविले तर आचरण श्रेष्ठ बनते. त्याला योगाची सांगड घातली तर बुद्धिची स्वच्छता वाढते. दिव्य गुणांच्या धारणेने जीवन सुगंधित होते आणि ईश्वरीय सेवेद्वारे जीवनात खुशी व शक्ती प्राप्त होते. त्यामुळे आपण चारही विषयात चांगले गुण मिळविण्याचा तीव्र पुरुषार्थ करू या. त्याचबरोबर मर्यादायुक्त जीवन जगून, मर्यादा पुरुषोत्तम बनू या. शेवटी मी हेच कळकळीचे आवाहन करेल –**

**मर्यादांचे पालन करूनी,**
**मर्यादा पुरुषोत्तम बनू या ।**
**स्वर्गीय राज्यभाग्य मिळवूनी,**
**शिवबाबांची आशा पुरवू या ।।**

***



# माझे जीवन धन्य झाले....

## (अनुभव)

**ब्र. कु. अनिल, राहुरी (अहमदनगर)**

माझे महाविद्यालयीन शिक्षण पूर्ण झाल्यावर मला शिक्षकाची नोकरी लागली. नोकरीच्या निमित्ताने मी घरापासून लांब होतो आणि त्याच काळात मला ब्रह्माकुमारीज् संस्थेचा परिचय प्राप्त झाला. माउंट आबू (राजस्थान) येथील संस्थेच्या मुख्यालयाला भेट देण्याचा योग आला. तेथील स्वच्छता, पवित्रता, शिस्त, सामंजस्य, आत्मिक प्रेम या सर्व गोष्टी पाहून मी अत्यंत भारावून गेलो.

लहानपणापासून मला स्वामी विवेकानंद व राष्ट्रसंत गाडगेबाबा या महान पुरूषांच्या विचारांची आवड होती. स्वामी विवेकानंदांची तेजस्विता, तपस्विता व चरित्र्य मला खूप आवडायचे. त्याचबरोबर गाडगेबाबांना जसे थोतांड, अंधश्रद्धा, बुवाबाजी आवडत नव्हती. ते कर्मयोगी, निस्वार्थी, विज्ञानवादी संत होते. ते पंढरपूरला येणाऱ्या लाखो भक्तांना कीर्तनातून प्रबोधन करीत. परंतु ते स्वतः कधीही विठ्ठलाच्या मंदिरात दर्शनासाठी गेले नाहीत. आपल्या मनमंदिरातील विकारांचा कचरा तसेच बाह्य वातावरणातील कचरा साफ करण्यासाठी ते प्रबोधन करीत. तशाच प्रकारचे कार्य या संस्थेतही केले जाते, याचा मला मा. आबूला बोध झाला. **येथील सर्व कार्य अधात्म आणि विज्ञान यांची उत्तम सांगड घालून, त्यावर आधारित दिसले. येथे कुठलीही अंधश्रद्धा नव्हती, कर्मकांड नव्हते, बुवाबाजी नव्हती. येथे मला हजारो तेजस्वी, तपस्वी व चारित्र्यवान ब्रह्माकुमार पहायला मिळाले. त्यामुळे मला ब्रह्माकुमारीज् संस्थेचे आंतरराष्ट्रीय स्तरावर होत असलेले आध्यात्मिक, शैक्षणिक, नैतिक व सामाजिक उत्थानाचे कार्य फारच आवडले.** फलस्वरूप मी या विश्व विद्यालयाचा सदस्य बनलो. मी नंतर सेंटरवर जाऊन साप्ताहिक कोर्स केला व रोज मुरली क्लासला जाऊ लागलो. वर्षातून एकदा किंवा दोनदा माउंट आबूला जाऊ लागलो. त्याचबरोबर जीवनातील प्रत्येक कर्म श्रीमताप्रमाणे करण्यासाठी प्रयत्नशील राहिलो. त्यामुळे माझे जीवन कवडीपासून हिरेतुल्य बनत गेले, खऱ्या अर्थी जीवन धन्य धन्य झाले.

सुरूवातीला २/३ वर्ष मला ज्ञान एवढे समजले नाही. फक्त चांगल्या गुणवान लोकांचा संग, माझ्या मनाला समाधान देत होता. म्हणून मी नियमितपणे विद्यालयात जात राहिलो. परंतु जसजसा बी. के. परिवाराशी संपर्क वाढत गेला. अनेक वरिष्ठ बांधवांशी बोलण्याची, त्यांचासोबत रहाण्याची संधी मिळत गेली. त्यांचे क्लासेस ऐकण्यात आले त्यावेळी ईश्वरीय ज्ञानाविषयी मनात ओढ निर्माण झाली. परमपिता शिव परमात्मा आता संगमयुगात अवतरित होऊन, मनुष्याला देवता बनविण्यासाठी सहज राजयोग शिकवीत आहेत ही गोष्ट हृदयात बिंबली. सुखकर्ता दुःखहर्ता केवळ एक शिव परमात्मा आहे व तोच आपला अविनाशी सर्व संबंधी आहे, याचा बोध झाला. त्यामुळे 'कोणी निंदा अथवा वंदा, आम्हा स्वहिताचा धंदा' या उक्तीप्रमाणे मी श्रीमतावर चालू लागलो.

समाजाचा हा अखिलीत नियम आहे की चांगले कार्य करणाऱ्याला, चांगले जीवन जगणाऱ्याला समाज सुरूवातीला नेहमी विरोध करतो. त्रासही देतो परंतु काही काळानंतर त्रास देणारे लोकच आपले सहयोगी बनतात. मला सुरूवातीला ज्ञानात चालतांना, लोकांच्या टीका-टिप्पणीला, त्यांच्या संघर्षाला तोंड द्यावे लागले. ह्या गोष्टी म्हणजे जीवनातील परीक्षा आहेत. असे

समजून मी शिवबाबांवर दृढ निश्चिय ठेऊन, सहन करीत गेलो, फलस्वरूप काही काळानंतर माझे संपूर्ण जीवन सुखमय झाले. माझ्या जीवनातील दुःख, अशांती, तणाव, चिंता, वैरभाव या सर्व गोष्टी समाप्त झाल्या. हे प्रत्यक्ष प्रमाण जेव्हा लोकांनी पाहिले तेव्हा त्यांनी माझ्यावर टीका-टिप्पणी करणे, सोडून दिले व एक आदर्श व्यक्तिमत्त्व म्हणून लोक माझ्याकडे पाहू लागले. शिक्षकाच्या नोकरीत माझा प्रगतीचा आलेख सतत वाढत गेला. **जेष्ठ समाजसेवक श्री. आण्णा हजारे यांच्या हस्ते मला 'आदर्श शिक्षक' म्हणून पुरस्कारही प्रदान करण्यात आला. ज्या ज्या ठिकाणी माझी बदली झाली त्या गावच्या शाळा, चांगल्या कार्यामुळे आदर्श बनल्या. हे सर्व श्रेय मी सर्वप्रथम शिवबाबांना तसेच त्यांनी स्थापन केलेल्या ब्रह्माकुमारीज् विद्यालयाला देतो.** कारण या ईश्वरीय विश्व विद्यालयात दिल्या जाणाऱ्या नैतिक शिक्षणामुळे माझ्या जीवनात निस्वार्थ वृत्ती, परोपकारी वृत्ती, दानशूरता व प्रामाणिकपणा वाढत गेला. त्यामुळे आजवर मी जेथे नोकरी केली तेथे अत्यंत इमाने-इतबारे केली. फलस्वरूप मला खूप नावलौकिक मिळाला. माझ्या संबंध-संपर्कात येणाऱ्या मुलांना शालेय शिक्षणाबरोबर श्रेष्ठ संस्काराचे धडे मी शिकवले. ईश्वरीय ज्ञानामुळे माझ्या वर झालेल्या श्रेष्ठ संस्कारांमुळेच मी विद्यार्थ्यांनाही तसे घडवू शकलो.

सुरूवातीला बरेच लोक म्हणायचे की ब्रह्माकुमारीज्च ज्ञान हे संसारी लोकांसाठी नसून, जे लोक बालब्रह्मचारी आहेत, त्यांच्यासाठी ते आहे. पण तसे काही नाही. उलट बी. के. परिवारात गृहस्थी लोक खूप आहेत. आज माझ्यासारखे लाखो गृहस्थी आपली नोकरी, व्यवसाय सांभाळून, एक आदर्श, सुखमय जीवन जगत आहेत. ही गोष्ट मी माझ्या अनुभवाने आपणास सांगू इच्छितो. माझ्या जीवनात स्वास्थ्य, संपत्ती व सुख या तिन्ही गोष्टी आहेत. **तुम्हाला आश्चर्य वाटेल की ज्ञानात आल्यापासून (मागील) १४ वर्षात माझ्या कुटुंबाच्या आरोग्यासाठी एक रूपया सुद्धा माझा खर्च झालेला नाही. याला मुख्य कारण म्हणजे राजयोगाचे पुढील ४ स्तंभ (१) शुद्ध अन्न (ब्रह्माभोजन) (२) पवित्रता (३) नियमित सत्संग (४) दैवी गुणांची धारणा. ज्यांचा अंगिकार मी जीवनात केला.**

बी. के परिवारात अनेक ज्ञानी व गुणी बंधुभगिनींच्या संपर्कात माझी स्वतःची गुणवत्ता वाढली. प्रत्येकाकडून काही ना काही शिकता आल्याने फलरूप जीवन समृद्ध होत गेलं. ईश्वरीय ज्ञान व राजयोगाच्या अभ्यासामुळे, मागील १४ वर्षात माझ्या संस्कार-स्वभावात खूपच परिवर्तन होत गेले. मी बहुतेक दरवर्षी उन्हाळ्याच्या सुट्टीत मधुबन पावन भूमीत सेवेसाठी आवश्य जातो. तेथील वास्तव्यात एकदा मला दिवंगत राष्ट्रपती डॉ. ए.पी.जे. कलाम यांना भेटण्याची संधी प्राप्त झाली. त्याचबरोबर दादी प्रकाशमणीजी, दादी जानकीजी, दादी गुलजारजी, दादी रतनमोहिनीजी यांच्यासारख्या विभूतींचे विचार जवळून ऐकता आले. त्यांच्या हातून टोली (प्रसाद) प्राप्त करता आली. मुख्य म्हणजे त्यांच्या पावन आत्मिक, परमसुखकारी दृष्टीने माझ्या जीवनाचे सोने झाले. त्रिकालदर्शी, ज्ञानसागर शिवबाबांनी करोडो आत्म्यांमधून मला निवडले व विश्व कल्याणाच्या महान कार्यात मला सहयोगी बनवले, यापेक्षा थोर भाग्य ते काय असणार? माझी नोकरीच मुळी शिक्षकाची असल्याने मी डबल शिक्षकाचा पार्ट सर्वत्र बजावतो. पुस्तकी ज्ञानाबरोबरच, सत्य ईश्वरीय ज्ञान देण्याचा प्रयत्न करतो. परिणामी मला अतिशय आनंद प्राप्त होतो. त्यामुळे संगमयुगात शिवबाबांनी मला शिक्षक बनवले म्हणून मी त्यांचे मनापासून आभार मानतो. संगमयुगात शिवबाबा देखील परम शिक्षक बनून, आपल्या लाडक्या मुलांना रोज ज्ञान प्रदान करतात.

शेवटी सर्व वाचक बंधुना मी हेच सांगू इच्छितो की तुमच्या जवळच्या भागात जेथे कुठे ब्रह्माकुमारीज् विद्यालयाची शाखा असेल, तेथे अवश्य भेट द्या. सदैव लक्षात ठेवा की अंतिम समयी केवळ ईश्वरच आपला सहारा बनू शकतो. शेवटी मी हेच म्हणेन- **किसका नही तू प्यारा, सबका तू ही सहारा....**

***